www.dainikmahabharat.com RNI No. MAHMAR/2015/64418 jaymahabharat2015@gmail.com

दैनिक
# महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) •दैनिक •मराठी •वर्ष - १० •अंक ३४६ • गुरूवार दि.०७ ऑगस्ट २०२५• किंमत २ रू. • पाने ४

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक



वॉशिंग्टन : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची घोषणा केली आहे. यापूर्वी ३० जुलै रोजी २५ टक्के शुल्काची घोषणा करण्यात आली होती, त्यात आता अतिरिक्त २५ टक्क्यांची भर घालण्यात आली आहे. येत्या २४ तासांत भारतावरील शुल्कात वाढ करणार असल्याचे सूतोवाच ट्रम्प यांनी मंगळवारीच केले होते,

## राष्ट्रगीतासोबत आता राज्यगीतही बंधनकारक असणार; शिक्षणमंत्री दादा भुसे

मराठी शाळेसोबतचं आता सर्व माध्यमांच्या शाळेसाठी आता मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या शाळांत आता राष्ट्रगीतानंतर राज्यगीतगाणं बंधनकारक करण्यात आलं आहे.'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत आता सर्वच शाळांमध्ये गाणे बंधनकारक असेल.जी शाळा या नियमाची अंमलबजावणी करणार नाही त्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिला आहे. मराठी शाळेत राष्ट्रगीत आणि राज्यगीत मानवंदनेने गायलं गेलं पाहिजे. मराठी शाळेसोबतचं आता सर्व माध्यमाच्या शाळेतही राष्ट्रगीतानंतर गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत गाणं बंधनकारक आहे असा आदेश देण्यात आला आहे.

पूर्वी इयत्ता चौथी आणि सातव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा होत होती. त्यानंतर पाचव्या आणि आठव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. मात्र, आता यानंतर इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेऊन शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा संकल्प दादा भुसे यांनी व्यक्त केला.

उच्च दर्जाच्या शिक्षणासोबतच आता विद्यार्थ्यांच्याही आरोग्याची काळजी शालेय शिक्षण विभाग घेणार आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांची जी काही तपासणी व्हायची ती औपचारिकरित्या व्हायची. मात्र, आता पालकांच्या उपस्थितीत आरोग्य पथक विद्यार्थ्यांची



तपासणी करणार आणि त्यानंतर विद्यार्थ्यांना एक हेल्थ कार्ड देणार आहे. हे हेल्थ कार्ड त्यांना आयुष्यात अनेक ठिकाणी उपयुक्त पडणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली.

## जिल्हा क्रीडा संकुलाला ना.अजितदादांनी दिला २५ कोटींचा निधी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रीडा संकुलाला उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी २५ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. बुधवारी (दि.६) रोजी झालेल्या बैठकीत हि मंजुरी देण्यात आली. बीड मतदारसंघासह जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रा संबंधित विकासाला चालना दिल्याबद्दल चालना दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत.



### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले आभार

बीड शहरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल याठिकाणी अनेक विकास कामे होणे आवश्यक होते. याबाबत आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा करत होते. बीड विधानसभा मतदारसंघ आणि बीड जिल्ह्यातील विविध खेळाडू या ठिकाणी सरावासाठी असतात. त्यांना दर्जेदार सुविधा आणि आवश्यक संसाधने यांची उपलब्धता असणे क्रमप्राप्त आहे. जिल्ह्याचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचावण्यासाठी खेळाडूंना आवश्यक सोयी-सुविधा देणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून आ.संदिप क्षीरसागर यांचा, जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध विकास कामे होण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा सुरु होता. त्यावर बीड येथे झालेल्या बैठकीत ना.अजितदादांनी जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकास कामांच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन २५ कोटी रुपयांचा भरघोस निधी दिला. या निधीतून छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलात मोठ्या प्रमाणावर विविध विकास कामे केली जाणार आहेत. त्यामुळे आ. क्षीरसागर यांनी ना.अजित दादांचे यांचे आभार मानले आहेत.

## मंत्रिमंडळात परफॉर्मन्स नसलेल्या मंत्र्यांना फेरबदलाचे संकेत

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांना कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणानंतर माध्यमांमध्ये बोलणं कमी आणि काम जास्त करण्याचा सल्ला एकनाथ शिंदेंनी मंत्र्यांना दिला आहे.



माध्यम किंवा जनसामान्यात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे स्वत: मंत्र्याचं आणि पक्षाचं नाव खराब होतं. विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला उत्तर दिलचं पहिजे असं नाही, त्यांना कामातून उत्तर द्या, अशी तंबीचं वाचाळवीर मंत्र्यांना एकनाथ शिंदेंनी दिली आहे. तसेच मंत्र्यांना जबाबदारी दिलेल्या जिल्ह्यातून निवडणुकांमध्ये अपेक्षित निकाल दिसला पाहिजे, असंही एकनाथ शिंदेंनी सांगितले. त्यामुळे अप्रत्यक्ष शिंदेंनी मंत्र्यांना अडीच वर्षाच्या कालावधीची आठवण करून देत मंत्रिमंडळात परफॉर्मन्स नसलेल्या मंत्र्यांना फेरबदलाचे संकेत दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली होती नाराजी-

राज्यातील मंत्र्यांच्या वर्तनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मित्र पक्ष असणाऱ्या शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली होती. मागील काही दिवसांमध्ये मंत्र्यांसंदर्भात आलेल्या तक्रारींवर देवेंद्र फडणवीस यांन नाराजी दर्शवली होती. गेल्या काही दिवसांमध्ये मंत्री संजय गायकवाड, मंत्री संजय शिरसाट, मंत्री माणिकराव कोकाटे चांगलेच चर्चेत राहिले. विधिमंडळात रमी खेळणारे माणिकराव कोकाटे (चरपळझीरे घेझरींश) यांची अखेर कृषिमंत्रीपदावरून उचलबांगडी करण्यात आली आहे. माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखात्याचा कारभार काढून घेण्यात आला.

## राजाभाऊ मुंडेंचा राष्ट्रवादीत प्रवेश, बीडच्या राजकारणाला नवे वळण

वडवणी ।प्रतिनिधी

बीडच्या राजकारणात गेल्या काही दशकांपासून भाजपचा एक भक्कम आधारस्तंभ असलेल्या राजाभाऊ मुंडे यांनी अखेर भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात आज प्रवेश केला आहे. वडवणी येथे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक प्रवेश सोहळा पार पडणार आहे. राजकीयदृष्ट्या या घटनाकडे 'घराणेशाही विरोधात निर्माण झालेली नवी मुभा' म्हणून पाहिलं जात आहे, तर काही जणांच्या मते हा निर्णय म्हणजे कार्यकर्त्यांच्या संयमाचा विस्फोटच आहे.

या सगळ्याचा सर्वात मोठा फटका २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बसला, जेव्हा त्या स्वतः आपल्या गडात पराभूत झाल्या. विशेष म्हणजे या काळात अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक देण्यात आली. राजाभाऊ मुंडे हेही त्यातलेच एक.राजाभाऊ मुंडेंच्या प्रवेशात केवळ पक्षांतर एवढाच भाग नाही, तर त्यामागे एक मोठा सामाजिक आणि राजकीय विचार आहे. बीड जिल्ह्यात वंजारी - मराठा समाजामधील वाढता दुरावा, राजकीय गटबाजी आणि त्यामुळे निर्माण झालेली अस्थिरता लक्षात घेता हा प्रवेश 'सामाजिक समेटासाठीचा प्रयोग' मानला जातो.आमदार प्रकाश सोळंके यांची भूमिका या सगळ्या



प्रक्रियेत महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी केवळ राजकीय समीकरणासाठीच नव्हे, तर राष्ट्रवादीच्या जिल्ह्यातील पुनर्बांधणीसाठीही हा डाव टाकला आहे.राजाभाऊंच्या राजकीय अनुभवासोबतच आता त्यांचे पुत्र बाबरी मुंडे यांचाही राष्ट्रवादीत प्रवेश निश्चित झाला आहे. त्यामुळे या प्रवेशाला पिढ्यानपिढ्या नेतृत्वासाठीची बीजपूजा मानली जात आहे. बाबरी हे सामाजिकदृष्ट्या सक्रिय असून, युवकांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा आहे. त्यामुळे बीडच्या राजकारणात त्यांचं आगमन एक नव्या दमाचा चेहरा म्हणून पाहिलं जातं. राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडेंच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाला बीडमध्ये नव्याने संजीवनी मिळाली आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये या नव्या घडामोडीचा निश्चितच मोठा परिणाम दिसून येणार आहे.भाजपला आतूनच सुरुंग लावण्याचे हे प्रारंभिक लक्षण असून,अनेक कार्यकर्ते आता 'नवीन दिशा, नवा पक्ष' या भूमिकेतून विचार करत आहेत.राजाभाऊ मुंडे यांच्या प्रवेशामुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात एक नवीन समीकरण निर्माण झालं आहे. फक्त एक नेत्याचा प्रवेश एवढ्यावर ही घडामोड मर्यादित नाही, तर हा विचारधारेचा - कार्यकर्त्यांच्या आत्मसन्मानाचा आणि नव्या राजकीय पर्वाचा आरंभ आहे. या प्रवेशामुळे गोपीनाथ मुंडेंच्या सहकाऱ्यांचा आवाज पुन्हा ऐकू येणार आहे का ? आणि राष्ट्रवादी त्याच्या बळावर बीडमध्ये नवा झेंडा रोवणार का ? हे पाहणं अति महत्त्वाचं ठरणार आहे.

### भाजपमधील ३५ वर्षांची निष्ठा

राजाभाऊ मुंडे हे भाजपमधील ते नेते, ज्यांनी कुठलीही पदाची हाव न ठेवता संघटनेच्या बांधणीसाठी स्वतःला झोकून दिलं. त्यांनी गोपीनाथ मुंडे यांचे 'संकटमोचक' म्हणून तीन दशकांहून अधिक काळ भूमिका बजावली. खास करून सहकार क्षेत्रात त्यांचे योगदान लक्षणीय ठरले. परंतु गोपीनाथ मुंडे यांच्या दुर्दैवी निधनानंतर राजाभाऊंचं राजकीय स्थान झपाट्याने मागे पडत गेलं. गोपीनाथ मुंडेंनंतर त्यांच्या कन्या पंकजा मुंडे यांच्याकडे सगळ्या कार्यकर्त्यांनी आशेने पाहिलं. त्यांच्याकडून 'मुंडे विचारांचा' वारसा पुढे नेण्याची अपेक्षा होती. पण त्या त्या जबाबदारीत अपयशी ठरल्या. राजकारणातील निर्णय, कार्यकर्त्यांशी संवादाचा अभाव, मतदारसंघातील दुर्लक्ष आणि सत्तेतील बदलाचा फटका यामुळे पंकजा यांची प्रतिमा आणि पक्षातील पकड दोन्ही कमजोर झाली.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य-उपमुख्यमंत्री अजित पवार

## पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवी तत्परतेने द्या

## विद्युत वितरण प्रणाली, क्रीडा विकासाचाही घेतला आढावा

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य आहे. जिल्ह्यातील काही ठेवीदारांच्या ठेवी विविध पतसंस्थांमध्ये अडकलेल्या आहेत. त्या त्यांना मिळाव्यात यासाठी सहकार विभाग, पोलिस आणि जिल्हा प्रशासनाने यांनी समन्वयाने कार्यवाही करत ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्यात, याला प्राधान्य द्यावे. बीड जिल्ह्यातील विविध पतसंस्थांनी ठेवीदारांची फसवणूक केली असून यामध्ये आतापर्यंत सुमारे १३२ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यामध्ये १२८ आरोपींना अटक केली उर्वरीत आरोपींच्या अटकेबाबत पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यंत्रणेला दिल्या. यासह जिल्ह्यातील विद्युत वितरण प्रणाली, क्रीडा विकासाचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्ह्यातील मल्टीस्टेट व राज्यस्तरावरील नोंदणीकृत पतसंस्था ठेवी परत करण्याबाबत, जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समिती, जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या कामकाजाचा आढावा पालकमंत्री पवार यांनी घेतला. यावेळी सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, सहकार आयुक्त दीपक तावरे, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, अश्विनी सोनवणे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री पवार म्हणाले, कोणत्याही दबावाला बळी न पडता अधिकाऱ्यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत आवश्यक



### चॅट बॉट व सेवा मित्र सुविधेचे उद्घाटन

शासनाच्या विविध योजना सामान्य लोकांपर्यंत एका क्लिकमध्ये पोहोचविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांना विश्वासार्ह, स्पष्ट आणि वेगवान सेवा पुरविण्यासाठी हा उपक्रम आहे. नागरिक आता त्यांच्या गरजेनुसार महत्त्वाची माहिती एकाच ठिकाणी अधिकृत आणि अद्यावत स्वरूपात पाहू शकतील, प्रस्तुत चॅट बॉटमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामधील विविध विभागांचे कार्यक्षेत्र स्पष्टपणे दर्शवले आहे. महसूल, निवडणूक, पुरवठा, संजय गांधी योजना, रोहयो, तक्रार निवारण आदी प्रमुख विभागांचा यामध्ये समावेश आहे. या अद्यावतीकरणामुळे नागरिकांना योजनेची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज कोठे व कसा करायचा, यासह सविस्तर माहिती चॅट बॉटमध्ये उपलब्ध आहे. याबरोबरच सेवा मित्र उपक्रमामध्ये विविध प्रकारचे प्रमाणपत्रे घरपोहोच देण्याची योजना आहे.



### जिल्ह्यातील डॉक्टर व आयएमए संघटना, व्यापारी, उद्योजकांशी चर्चा

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील डॉक्टर व इंडियन मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील अडचणींबाबत चर्चा केली. संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे व सचिव डॉ.अमोल गिते यांच्यासह जिल्ह्यातील डॉक्टरांनी आपल्या अडचणी मांडल्या. संघटनेकडून मांडण्यात आलेल्या अडचणीबाबत सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल. तसेच बीड जिल्हा रूग्णालयामध्ये आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्यासही प्राधान्य असेल, असेही पालकमंत्री पवार म्हणाले. तसेच जिल्ह्यातील उद्योजक व व्यापारी यांनीही त्यांच्या अडचणी मांडल्या व पालकमंत्री पवार यांच्याशी चर्चा केली. जिल्ह्यात सर्वांनी मिळून उद्योगास पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले.

## संपादकीय

# हास्याचा पेटारा!

अमेरिकेच्या यापूर्वीच्या कुठल्याच राष्ट्राध्यक्षांची झाली नसेल, एवढी टिंगल आणि निर्भर्त्सना सध्या डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर सुरू आहे. खुद्द अमेरिकेतही त्यांच्याबाबत प्रचंड निराशा दाटली असून त्यांच्या विक्षिप्तपणाचे किस्से समाजमाध्यमांतून वेगाने पसरवले जात आहेत. त्यांच्या मानसिक स्थितीविषयी, मानसिक क्षमतेविषयी शंका उपस्थित केल्या जात असून त्यासाठी पाश्चात्त्य मनोवैज्ञानिकांच्या साक्षी काढल्या जात आहेत. ट्रम्प यांची पहिली कारकीर्दही वादग्रस्त होती. पण, आताएवढी टाकाऊ नव्हती. आज त्यांच्या बौद्धिक, मानसिक क्षमतेबद्दलच्या ज्या चर्चा आंतरराष्ट्रीय माध्यमं करू लागली आहेत, त्याची काही लक्षणं त्या कारकिर्दीतही दिसली होती. पण, याआधीच्या चार वर्षांत अमेरिकेचे वयोवृद्ध अध्यक्ष ज्यो बायडन यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यानंतर अमेरिकन मतदाराने घाईघाईने ट्रम्प यांना निवडलं. पण, अमेरिकन मतदाराच्या नशिबी आलेलं हताशपण काही हटलं नाही. झाडातून उठून विहिरीत पडल्यासारखी अमेरिकन मतदाराची अवस्था झाली आहे. 'सर्वशक्तिमान', 'जादुई भूमी' म्हणून ज्या अमेरिकेकडे, तिथल्या राज्यकर्त्या यंत्रणांकडे आणि प्रशासनाकडे पाहिलं जात होतं, ते सगळं किती पोकळ होतं, याची जाणीव आता जगातल्या सर्व देशांना होऊ लागली आहे. 'अमेरिकेला पुन्हा गतवैभव मिळवून देऊ', 'अद्वितीय अशा अमेरिकेला तिचं स्थान पुन्हा मिळालं पाहिजे' अशा घोषणा देऊन सत्तेत आलेल्या ट्रम्प यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष, अमेरिकेची धोरणं आणि तिथल्या अतुलनीय-जबर प्रशासनाला 'हास्याचा पेटारा' बनवलं आहे. भारतावर २५ टक्के आयात शुल्क लावल्यावर आता पुन्हा ते वाढवण्याची ट्रम्प यांची घोषणा केवळ भारतातच नव्हे, युरोपासह सर्व प्रगत देशात हास्यास्पद ठरली आहे, ती त्यामुळेच.

'अमेरिका शत्रू म्हणून जेवढं नुकसान करतो, त्यापेक्षा जास्त मित्र म्हणून करतो' याचा प्रत्यय भारतीयांना पुन्हा एकदा येतो आहे. 'भारताचा सर्वात विश्वासू मित्र' म्हणवून घ्यायचं, भारताला थातुरमातुर मदत करायची आणि दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भरभक्कम अनुदान मिळवून द्यायचं; पहलगाम हल्ला झाल्यानंतरही पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांसोबत स्नेहभोजन घडवून आणायचं - या गोष्टी न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही आणि दुबळाही नाही, याची जाणीव भारताने करून देणं आवश्यक होतं. ट्रम्प यांच्या २५ टक्क्यांच्या आयात करानंतर आणि आता आणखी आयात कर लादण्याच्या धमकीनंतर भारताने अमेरिकेला जे प्रत्युत्तर दिलं, ते म्हणूनच अत्यंत महत्त्वाचं ठरलं. 'भारताची प्रतिक्रिया अत्यंत परिपक्व असल्या'ची प्रतिक्रिया जगातील बहुतेक राष्ट्रांनी व्यक्त केली, ती त्यामुळेच. भारताची अर्थव्यवस्था मुळात ग्राहककेंद्री आहे. निर्यातक्षम अर्थव्यवस्था नाही. त्यामुळे, भारत आणि अमेरिकेतला आयात - निर्यात व्यापाराचा तोल बिघडवून भारताचं कमी; अमेरिकेचंच जास्त नुकसान होणार आहे. भारतातून जी स्वस्त आयात होत होती, जे स्वस्त मनुष्यबळ उपलब्ध होत होतं, त्यायोगे अनेक सेवा भारतातून मिळवता येत होत्या, त्याला अमेरिका पारखी होण्याची शक्यता आहे. हे करून ट्रम्प नेमकं काय साधणार आहेत? जे ट्रम्पना कळत नाही, ते अमेरिकन प्रशासनात कोणालाच कळत नाही असं समजायचं कारण नाही. प्रशासनाला ते दिसतं आहे. पण, सध्यातरी सूत्र ट्रम्प यांच्या हाती आहेत. अमेरिकन राज्यव्यवस्थेत अध्यक्ष हा सर्वशक्तीमान असतो. एकाच व्यक्तीवर अतिविश्वास ठेऊन व्यवस्थेचा कसा तोटा होतो, हे सध्या अमेरिकेची जनता पाहते आहे. यानंतर कदाचित तिथेही समतोल व्यवस्थेच्या निर्मितीसाठी घटनात्मक दुरुस्त्या करण्याची वेळ येईल!

भारतावर २५ टक्क्यांचा आयात कर लावताना ट्रम्प यांनी भारत आणि रशियातील तेल कराराचं कारण पुढे केलं आहे. भारताचा रशियासोबतचा हा करार गेल्या तीन वर्षांपासूनचा आहे. रशिया भारताला जगात सर्वाधिक स्वस्त तेल आणि काही लष्करी यंत्रसामग्री देत असेल, तर ती भारताने का घ्यायची नाही? कोणत्याही सार्वभौम देशाला त्याच्या फायद्यानुसार व्यापार करण्याचा हक्क आहे. तो भारतालाही आहे.

# संत ज्ञानेश्वर मुकबधिर विद्यालयातील मुलींनी बनवल्या बियांपासून सुबक राख्या

तुळजापूर/अजित चव्हाण
(दै.महाभारत)

कळंब:-श्रावण महिन्यातील राखी पौर्णिमा सण जवळ आल्याने मुकबधिर मुलींनी पर्यावरण पूरक राख्या बनवण्यासाठी सुरुवात केली. तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगाव ता.कळंब संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय ता. कळंब जि.धाराशिव येथील चौथी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींमध्ये पर्यावरण प्रेम व स्वालंबनाचे मूल्य रूजवण्यासाठी व त्यांच्यातील सृजनशीलता, कल्पतेला चालना मिळावी यासाठी राख्या बनवण्याचा उपक्रम शाळेमध्ये घेण्यात आला. मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने मुलींना विविध प्रकारच्या राख्या बनवण्यास मुकबधिर मुलींना प्रशिक्षण देऊन त्यांना साहित्य उपलब्ध करून दिले व त्यांनी आपल्या मूकबधिर भावांसाठी सुंदर अशा बियांपासून व विविध प्रकारच्या राख्या बनवलेल्या आहेत. बियांपासून राखी बनवण्याचा मुख्य उद्देश म्हणजे हातात बांधलेल्या राखीतील बिया इतरत्र पडून त्या ठिकाणी नवीन वृक्ष निर्माण व्हावे व वृक्ष लागवड व्हावी. यासाठी बियांपासून राख्या निर्माण केलेल्या आहेत.

भावा बहिणीचं प्रेमाचं नातं कायम राहावं यासाठी मुकबधिर मुलींनी स्वतःच्या हाताने विविध प्रकारच्या राख्या साकारल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असे विविध उपक्रम शाळा नेहमी घेत असते. रेशमाची राखी भावाच्या हातात बांधण्यासाठी स्वतःची कलाकुसर वापरून रक्षाबंधनासाठी सुंदर अशा विविध डिझाईनच्या मोत्यापासून, बियांपासून, मातीपासून तसेच अनेक प्रकारच्या राख्या त्यांनी बनवलेले आहेत. या राख्यांसाठी परिसरातील नागरिकांचा प्रत्येक वर्षी चांगला प्रतिसाद मिळत असतो. याचाच विचार करून याही वर्षी ज्या मुलींना ऐकता येत नाही व बोलता येत नाही अशा कर्णबधिर मुलींनी आपल्या परिसरातील भावांसाठी सुबक राख्या बनवलेल्या आहेत. यातून मुलांना स्वतःचा पूरक व्यवसाय करता यावा व आर्थिक व्यवहार त्यांना कळवा यासाठी असे उपक्रम तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालयात असे प्रत्येक सणाला नवनवीन उपक्रम सतत सुरू असतात.



त्यातीलच एक भाग म्हणून राखी पौर्णिमेनिमित्त सर्व आपल्या भावांना बांधण्यासाठी खूप छान अशा राख्या मुलींनी बनवलेले आहेत. या राख्या बनवण्यासाठी मूकबधिर शाळेतील विशेष शिक्षिका सुनंदा गायकवाड व सुनिता गुंड यांनी या मुलींना मार्गदर्शन केलेले व त्यांच्यासाठी कच्चा माल उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवरयांनी केलेले आहे. शाळेतील सर्व मुलींनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला.


# नव्वद टक्के अनुदानावर घेतलेले तूर पीक जोमात, आदिवासी शेतकऱ्यांचे कष्ट फळाला

## तालुका कृषी विभागाची भेट, पत्रकारांचे सहकार्य!

कल्याण / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने९०टक्के अनुदानावर देण्यात आलेले तूर बियाणे कल्याण तालुक्यातील गोवेली ठाकूरपाडा येथील आदिवासी शेतकरी गणपत लुखा हिंदोळे यांनी आपल्या शेताच्या बांधावर लावले आणि कृषी अधिकां-याच्या मार्गदर्शनानुसार लागवड केली व मेहनत घेतली, त्यामुळे सध्या हे पीक अंत्यत जोमात आले असून आज तालुका कृषी विभागाचे अधिकारी यांनी या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पीक पाहणी केली तसेच वांगी रोपांच्या रोगाबाबत मार्गदर्शन करून उपाययोजना केल्या.

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने९०टक्के अनुदानावर भात बियाणे वाटप करण्यात आले होते, कल्याण पंचायत समितीचे बीडिओ संजय भोये यांच्या हस्ते याचा शुभारंभ करण्यात आला होता, यावेळी आदिवासी शेतकरी गणपत लुखा हिंदोळे हा काही कारणास्तव अनुपस्थितीत होता, तेव्हा पत्रकार संजय कांबळे यांनी हे तूर बियाणे घेऊन



शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन दिले होते, तसेच पंचायत समितीचे कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, एस एस संत यांनी शेतात जाऊन शेतकऱ्यांला मार्गदर्शन केले होते, त्यानुसार त्याने हे बियाणे शेताच्या बांधावर लागवड केली होती, याची योग्य काळजी व मेहनत या शेतकऱ्यांने घेतली होती, याचे फळ म्हणजे तूर पिकांची रोपे अंत्यत चांगली व जोमात आली आहेत, आता यांची उंची२/३फुटांपर्यंत पोहचली आहे, ही रोपे वादळी वारा, पाऊस यामुळे खाली जमिनीवर पडू नये म्हणून या शेतकऱ्यांने प्रत्येक रोपांना बाबूंच्या काठीचा आधार दिला आहे. त्यामुळे हे दृश्य खूपच सुंदर दिसत आहे.

अशातच या शेतकऱ्यांच्या वांगी पिकावर करपा रोग पडला आहे, याबाबत पत्रकार श्री कांबळे यांनी बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. याची दखल घेऊन तालुका कृषी विभागाच्या उप कृषी अधिकारी प्रवीण बि-हाडे, सहाय्यक कृषी अधिकारी दिपाली बांडे यांनी हिंदोळे यांच्या शेतावर भेट दिली. यावेळी मर भुरी व करपा रोगावर किटकनाशक व बुरशीनाशकांची फवारणी करण्याचे मार्गदर्शन व केले व तूर पिकांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी शेतकरी गणपत हिंदोळे यांनी शासन व पत्रकार कांबळे यांचे आभार मानले.

# शरद इन्स्टिट्युटच्या १५ विद्यार्थ्यांची राणे मद्रास कंपनीत निवड

इचलकरंजी । संभाजी गुरव
(दै.महाभारत)

यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची राणे मद्रास लिमिटेड नामांकित कंपनीत निवड झाली. महाविद्यालयातील मेकॅट्रॉनिक्स, इलेक्टॉनिक्स अँण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व इलेक्ट्रीकल विभागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली.

मेकॅट्रॉनिक्स विभागातील प्रियंका देवकाते, अंजली एकसंबे, तनुजा वडगे, सायली खडके, प्रगती पाटील, विशाखा पाटील, नम्रता पाटील, अशिका शेट्टी, प्रणाली चौगुले, इलेक्टॉनिक्स अँण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमधील श्वेता सांगले, तपस्या जाधव, मोक्ष तकडे, प्राजक्ता जाधव, इलेक्ट्रीकलमधील कोमल पाटील, अक्षता हिरेमठ यांची निवड झाली.

राणे (मद्रास) लिमिटेड ही राणे ग्रुप ऑफ कंपन्यांचा एक भाग आहे. जी स्टीअरिंग आणि सस्पेंशन सिस्टीमच्या निर्मिती आणि वितरणात गुंतलेली आहे. कंपनीने उत्पादित केलेल्या मुख्य घटकांमध्ये मॅन्युअल स्टीअरिंग, गियर प्रॉडक्ट्स (एसजीपी) आणि सस्पेंशन अँड स्टीअरिंग लिंकेज प्रॉडक्ट्स (एसएसएलपी) यांचा समावेश आहे. इतर उत्पादनांमध्ये टाय रॉड असेंब्ली, ड्रॅग लिंक असेंब्ली, सेंटर लिंक असेंब्ली आणि गियर शिफ्ट बॉल जॉइंट्स यांचा समावेश आहे. त्यांची उत्पादने अशोक लेलँड, व्होल्वो, एम अँड एम, टाफे, टाटा आणि इतर अनेक ऑटोमोबाईल कंपन्याचा समाविष्ट आहेत. टाटा मोटर्स त्यांचे प्रमुख ग्राहक आहेत. कंपनीचे मुख्यालय चेन्नई येथे आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग अंतर्गत सुरू असलेल्या ॲक्टीव्हिटी स्लॉटमध्ये मुलांच्याकडून ग्रुप डिसक्शन, इंटरव्ह्यु टेक्नीक्सचा सराव करून घेण्यात आला आहे. व्हॅप अंतर्गत व प्रोजेक्ट बेसड लर्निंग याचा फायदा विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी झाला.निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेलचे प्रा. नेहा प्रसून यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# संघ गंगा के तीन भगीरथ नाटकाने प्रेक्षकांची जिंकली मने

इचलकरंजी/संभाजी गुरव
(दै.महाभारत)

राधिका क्रिएशन्स नागपूर-पुणे आणि विश्वराज रिस्पॉन्सिबल रिव्होल्युशन्स प्रस्तुत संघ गंगा के तीन भगीरथ या हिंदी नाटकाचे सादरीकरण श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाले. या नाटकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिले तीन सरसंघचालक, डॉ. केशव बळीराम हेडगेवार, माधव गोळवलकर (गुरुजी) आणि बाळासाहेब देवरस यांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटना, त्यांचे त्यागमय जीवन आणि राष्ट्रासाठीचे योगदान हृदयस्पर्शी शैलीत उलगडण्यात आले.

नाटकात डॉ. हेडगेवारांचे बालपण, महात्मा गांधींसोबतची



ऐतिहासिक भेट, गुरुजींची साधना, सरदार पटेल व गुरुजींचा संवाद, काश्मीर प्रश्नावरील भूमिका, संघावर लादलेली बंदी, बाळासाहेब देवरसांचे भाषण, आणीबाणीतील सत्याग्रह, रामजन्मभूमी आंदोलन अशा अनेक टप्प्यांतून संघाचा शंभर वर्षांचा कालखंड प्रभावीपणे साकारला गेला.

नाटकातील दृश्यरचना, घडामोडींचे सादरीकरण आणि संवादांनी उपस्थित प्रत्येक प्रेक्षकांच्या मनावर गारुड केले. प्रेक्षकांनी अनेक प्रसंगांना टाळ्यांनी दाद दिली. विशेषतः 'कार्य मग्न जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती' हा मंत्र अनेकांच्या अंतःकरणाला भिडला. हे नाटक केवळ नाट्यप्रयोग न राहता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मूल्यांची, कार्यपद्धतीची आणि भारतमातेसाठी समर्पित जीवनाची जिवंत अनुभूती देणारा एक सशक्त दस्तऐवज ठरला. संघशताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर हे नाट्यप्रयोग कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरला आहे.

नाटकाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजनाने झाली. या वेळी संघाचे विभाग सहसंघचालक भगतराम छाबडा, तालुका संघचालक रमेश लाहोटी, ज्येष्ठ स्वयंसेवक दत्तोपंत जोशी, जिल्हा कार्यवाह डॉ. राजेश पवार, आर्य चाणक्य पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र राशिनकर, संस्थापक अध्यक्ष जवाहर छाबडा, लोककल्याण मंडळाचे अध्यक्ष अरविंद कुलकर्णी आणि प्रांत कार्यकर्ते श्रीकांत प्रभुदेसाई आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन नरोत्तम लाटा यांनी केले.

# महसूल सप्ताह निमित्त मौजे सिरंजनी येथे वृक्षारोपण

अंगद सुरोशे ।हिमायतनगर
(दै.महाभारत)

मौजे सिरंजनी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे उपविभागीय अधिकारी श्री अविनाशजी कांबळे व हिमायतनगरच्या तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण चा कार्यक्रम संपन्न झाला.जागतिक तापमानातील वाढीमुळे व हवामान बदलामुळे पृथ्वीवरील मानवाचं, सजीवांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांचा अति वापर, त्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे शहरात श्वास घेणं कठीण झालंय. शुद्ध हवा, ऑक्सिजन पाहिजे असेल तर झाडांशिवाय पर्याय नाही. वृक्ष



आपल्याला फक्त पाने, फुलेच देत नाहीत, तर आपल्याला जगण्याची ऊर्जा देतात. नवी आशा देतात. उमेद देतात. म्हणूनच..... वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे. वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करा असे मत उपविभागीय अधिकारी श्री अविनाशजी कांबळे यांनी व्यक्त केले.

पृथ्वीवरील वने, माती, हवा, पाणी व जैवविविधता यांसह सर्व नैसर्गिक संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे, तसेच पुढील पिढ्यांसाठी त्यांचे संवर्धन करणे, मानवनिर्मित कृतीमुळे पृथ्वीवर होणारे प्रदूषण व पर्यावरणाची नासाडी रोखणे किंवा त्याला आळा घालणे. याविषयी जनजागृती घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्याची गरज आहे.- श्रीमती पल्लवी टेमकर, तहसीलदार हिमायतनगर

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पवन करेवाड सिरंजनीकर, नायब तहसीलदार श्री पंगे साहेब हिमायतनगर मंडळचे मंडळ अधिकारी श्री चव्हाण साहेब, हिमायतनगर सज्जाचे तलाठी श्री पुरी साहेब, सिरंजनी सज्जाचे तलाठी श्री शेख साहेब,पळसपूर सज्जाचे तलाठी सब्बनवार साहेब श्री विशाल शेवाळकर तसेच सिरंजनी हिमायतनगर शिवारातील शेतकरी उपस्थित होते.

# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार

## कॉ.उज्वला पडलवार यांना मिळणे म्हणजे त्यांच्या कार्याची पावती : कॉ. गंगाधर गायकवाड

माहूर (दै.महाभारत)

दि.३ऑगस्ट रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिना निमित्ताने निवडक दहा व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.त्या मध्ये नांदेड येथील कामगार चळवळीतील लढाऊ साथी कॉ. उज्वला पडलवार यांचा समावेश आहे.शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केजमध्ये सुरू असलेला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचा पुरस्कार सोहळा बीडमध्ये घेऊन आले ही कौतुकाची बाब आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य चंद्र-सूर्य असेपर्यंत जनमानसात जिवंत राहील. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.३) शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार वितरण आणि क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.बजरंग सोनवणे हे होते.

शेकापक्षाचे ध्वजारोहण राज्य चिटणीस मंडळ सदस्या चित्राताई गोळेगावकर व प्रा. उमाकांत राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेत्या सुशिला मोराळे, माजी आमदार उषा दराडे, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, राजकुमार घायाळ (हमाल मापाडी महामंडळ), अॅड.अजय बुरांडे (माकप), इकबाल पेंटर, चंद्रकांत चव्हाण (शिक्षक आघाडी), भाऊराव प्रभाळे (भाकप), राजेश घोडे (आझाद क्रांती सेना), रोहिदास जाधव (एसएफआय), प्रा. पंडित तुपे (युक्रांद), गणेश मस्के (संभाजी ब्रिगेड), ड. राहुल वायकर (विभागीय संभाजी ब्रिगेड), नितीन सोनवणे (पँथर सेना), सुभाष लोणके (डीपीआय), ड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), अशोक येडे (आप) आदी मान्यवर उपस्थित होते.




कॉ.उज्वला पडलवार यांचे कार्य उल्लेखनीय असून त्यांनी अनेक यशस्वी आंदोलने करून कामगार कष्टकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे.कॉ.पडलवार ह्या सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीटू) राज्य सचिव असून नांदेड जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहतात.त्यांच्या कार्याची दखल शेतकरी कामगार पक्षाने घेतली असून त्यांना कामगार क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले म्हणजे त्यांच्या कामाची ही पावती आहे असे सीटू जिल्हा जनरल सेक्रेटरी कॉ.गंगाधर गायकवाड मनोगत व्यक्त केले आहे.कॉ.उज्वला पडलवार यांचा जन्मदिवस ४ ऑगस्ट रोजी आहे आणि आदल्या दिवशी त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्यामुळे सर्व स्तरातून त्यांना सदिच्छा देण्यात येत आहेत.-कॉ. गंगाधर गायकवाड,जनरल सेक्रेटरी सीटू नांदेड जिल्हा कमिटी.

## बेधडक

### राजकीय बदल...!

कालपर्यंत एक विचार घेणारे पक्ष आज वेगळा विचार करत आहेत, स्वतःला हवा तसा राजकीय बदल कार्यकर्त्यांवर लादत आहेत...!

वैचारिक राजकारण अशाने मागे पडतांना दिसत आहे, राजकीय पक्षांचा स्वार्थीपणा आता जनतेलाही उमगत आहे.!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com
* टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अधिका-यांच्या हेकेखोरपणामुळे माजलगाव तालुक्यात रेशीम उद्योग शेतीची लागली वाट

## २०२१ - २०२२ पासुनचे अनुदान मिळण्यासाठी शेतक-यांचा आंदोलनाचा इशारा- जिल्हाधिका-यांना निवेदन

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

देशातील शेतकरी हा रेशीम उद्योग शेतीकडे वळावा व कमी खर्चामध्ये शेतक-यांना चांगले उत्पादन मिळावे यासाठी केंद्र सरकारने रेशीम उद्योग शेतीसाठी अनुदानाची योजना राबविली त्यासाठी माजलगाव तालुक्यात नित्रुड या गावातील पंधरा ते सोळा शेतक-यांनी रेशीम शेती सुरू केली. यामध्ये शिवराज धर्मराज फाटे या शेतक-याने अनेक पुरस्कार प्राप्त केले. माजलगाव तालुक्यात रेशीम शेती उद्योगात हजारो शेतक-यांचा सहभाग होवुन प्रचंड उत्पादन वाढले असते परंतु अधिका-यांच्या हेकेखोरपणामुळे शासनाचे कुशल बील अनुदान दोन वर्षांपासुन न दिल्याने शेतकरी उदासिन झाला असुन वर्षे २०२१ - २०२२ चे कुशल देयक आम्हा शेतक-यांना तात्काळ द्यावे अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपाचे जेष्ठ नेते अरूणराव राउत यांनी दिला आहे.

माजलगाव तालुक्यामध्ये मागील अनेक वर्षांपासुन रेशीम शेतीकडे शेतकरी मोठ्या प्रमाणात वळला होता. तालुक्यातील अनेक शेतक-यांनी सहज आणि सोप्या पध्दतीने कष्टाने व मेहनतीने रेशीम शेती करण्याचा संकल्प केला होता. केंद्रीय शेती धोरणाप्रमाणे हेक्टरी चार लाख ३८ हजार अनुदान शेतक-यांना मिळत होते. मिळणारे उत्पन्न व अनुदान यामुळे शेतकरी ब-यापैकी परवडणारी रेशीम शेती करत होता. परंतु जिल्हाधिकारी बीड यांना वारंवार निवेदने, सुचना देउनही बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शेतक-यांना वेळेवर अनुदान मिळाले मात्र माजलगाव तालुक्यातील ३० ते ३५ शेतक-यांना वर्षे २०२१ - २०२२ या दोन वर्षांचे अनुदान न मिळाल्याने शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात आला आहे. बीडचे जिल्हाधिकारी यांना भेटुनही हे बिले का निघत नाहीत ? तर रेशीम शेतीचे आयुक्त यांनीही फोन करून सांगुनही उपजिल्हाधिकारी श्री. मुळे हे बीले का काढत नाही ? हा शेतक-यांना पडलेला प्रश्न आहे. माजलगाव तालुक्यातील शेतकरी शिवराज फाटे, पांडुरंग बडे, विनोद तोंडे, माणिक डाके, सचिन लगड, कोंडाबाई सपकाळ, विष्णु साठे, विष्णु शिंपले यासह दत्तात्रय डाके हे अनुदान रखडलेल्या शेतक-यांचे अनुदान जिल्हाधिकारी बीड यांनी तात्काळ खात्यात जमा करावे व रेशीम शेती उद्योग वाचवावा आणि शेतक-यांना रेशीम शेतीसाठी प्रोत्साहीत करावे अन्यथा शेतक-यांसोबत घेत आपण तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपा नेते अरूण राउत यांनी दिला आहे.





# आराध्या इम्लीश शाळेत दिलीप पवार सेवापुर्ती निरोप समारंभ

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दै.महाभारत)

आराध्या इंग्लिश शाळेत , दिलीप पवार खुलताबाद जिल्हा परिषद शाळेचे उत्कृष्ट मुख्याध्यापक म्हणून सेवा विद्यार्थी घडवण्याचं काम केल्याची जाणीव ठेवून, व वाळूज केंद्र प्रमुख सेवापुर्ती निरोप समारंभात सपत्नीक आदर्श व्यक्तिमत्व गौरवार्थ गौरव, सन्मान चौथा स्तंभ पत्रकार संघर्ष समिती मार्फत स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकार संघर्ष समितीचे अध्यक्ष वसंता शिरसाट गल्लेबोरगावकर यांनी मनोगत व्यक्त करताना आराध्या इंग्लिश शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनीचे कौतुक केले कारण हे लहान विद्यार्थी विद्यार्थिनी एकदम शिस्तीने, शांत मनाने मनोगत ऐकत होते यावरून असे वाटत होते की शाळेतील शिक्षक उत्कृष्ट शिकवण मुलांना देत असल्याचे दिसून आले. शाळेतील शिक्षक वृंद व मुख्याध्यापिका यांच्या शिकवणीचा खरंच सन्मान करायला पाहिजे. हेच अवचित्य साधून सौ. शीतल देशमुख सोनवणे यांचा आदर्श मुख्याध्यापिका आणि सोनवणे सर यांचाही आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला .या वेळी , पत्रकार संतोष करपे आजिनाथ बारगळ ज्येष्ठ पत्रकार वसंता शिरसाट गल्लेबोरगावकर , तसेच अश्विनी नागे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे आराध्या इंग्लिश शाळेचे मुख्याध्यापिका शितल देशमुख सोनवणे यांनी शाल श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. व शाळेचे वतीने आभार व्यक्त केले

# बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब गोल्डन अवार्डने ॲड रविंद्र कानडे सन्मानित

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

दिनांक ५ ऑगस्ट रोजी जालना येथे विभागातील विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या रोटरी क्लब चा पुरस्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्यामध्ये माजलगाव रोटरी क्लब चे अध्यक्ष ड रवींद्र कानडे यांना बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब म्हणून गोल्डन अवार्डने सन्मानित करण्यात आले...



सन २०२४-२५ या वर्षांमध्ये रोटरी क्लब ऑफ मजलगांव सिटी चे अध्यक्ष ड रवींद्र कानडे यांनी अनेक सामाजीक,सांस्कृतिक,आरोग्य व इतर सेवाभावी उपक्रम यशस्वी राबवले त्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य,नेत्र, रक्तदान शिबीर त्याचबरोबर वृक्षारोपण,स्टुडेंट टॅलेंट सर्च परीक्षा, शाळेच्या विद्यार्थ्यांना सायकल,स्पोर्ट शूज ,कम्प्युटर,टीव्ही वाटप असे अनेक विविध उपक्रम राबवण्यात आले. या उल्लेखनीय कार्याची विभागीय स्तरावर नोंद घेत त्यांना सन्मानचिन्ह प्रधान करून सन्मानित करण्यात आले.

ड रवींद्र कानडे यांनी या पुरस्कार प्राप्ती संदर्भात माध्यमाशी बोलताना सांगितले कि, रोटरी क्लब च्या सचिव सौ. लता जोशी, सर्व प्रोजेक्ट चेअरमन व सन्माननीय सभासद यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले रोटरी क्लब च्या विभागात १८ जिल्हे आहेत त्यामध्ये एकूण १०५ रोटरी क्लब येतात त्यामध्ये आपल्या माजलगाव शहराला मिळेल हा पुरस्कार अभिमानाची बाबा आहे निश्चितच मला सामाजिक सेवेमध्ये कार्य करण्यासाठी प्रेरणा व ऊर्जा देणारा हा पुरस्कार आहे या पुढे देखील मी नेहमीच सामाजिक कार्यासाठी अग्रेसर राहील .या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री सुरेश साबू, विद्यमान प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल, क्षितिज झवारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## शिवमुद्रा बहुद्देशीय मित्र मंडळ आणि सार्थक सिद्ध सेवा फाउंडेशन आयोजित

# 'शिवमुद्राचा चिंतामणी' गणरायाचे १२रोजी भव्य आगमन..सटाण्याचे बॅन्ड पथक दिमतीला

जळगाव / महेश शिरसाठ
(दै.महाभारत)

येथील प्रभाग क्रमांक ८ आणि चंदू अण्णा नगर परिसरात शिवमुद्रा बहुद्देशीय मित्र मंडळ आणि सार्थक सिद्ध सेवा फाउंडेशन आयोजित 'शिवमुद्राचा चिंतामणी' गणपती आगमन सोहळ्यानिमित्त कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून गणेश मंडळांच्या अध्यक्षपदी आकाश भालेराव यांची तर उपाध्यक्षपदी वरुण मैराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे .नुतन कार्यकारिणीत खजिनदारपदी हितेश पाटील, मल्हार पाटील, सचिव समाधान पाटील, निखिल नेरकर, मयूर चौधरी, गणेश कुंभार आणि सल्लागार कार्तिक परदेशी, शिव पवार, अक्षय चव्हाण यांचा समावेश आहे. गणेश उत्सवात सार्थक सिद्ध सेवा फाउंडेशन चे संचालक लक्ष्मी कुमावत आणि शिवमुद्रा महिला मंडळ यांचाही मोलाचा समावेश आहे. तर जय बजरंग मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते ह्यांचे देखील अनमोल सहकार्य लाभत आहे

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही चंदू अण्णा नगर च्या पुढे, सत्यम रेसिडेन्सी आणि पवार पार्क परिसर तसेच प्रभाग क्र. ८ मध्ये प्रथमच भव्यदिव्य अशा गणपती बाप्पाच्या आगमन सोहळ्याचे आयोजन शिवमुद्रा बहुद्देशीय मित्र मंडळ आणि सार्थक सिद्ध सेवा फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात येत आहे .

हा भव्य आगमन सोहळा दि. १२ ऑगस्ट २०२५, मंगळवार रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत पार पडणार असून, यासाठी मंडळाने मोठ्या तयारीचे आयोजन केले आहे. प्रभाग क्रमांक ८ आणि चंदू अण्णा नगर परिसरातील हा पहिलाच आणि सर्वात मोठा श्री गणेश आगमन सोहळा ठरणार आहे. या . या सोहळ्यात प्रमुख आकर्षण म्हणून मूर्तिकार श्री नंदन महाजन यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आलेली भव्य दिव्य अशी २६ फूट उंच श्रीं ची आकर्षक मूर्ती त्या सोबतच श्री देव मामलेदार ब्रास बँड, सटाणा या प्रसिद्ध बँड पथकाचे सादरीकरण होणार असल्याचने सोहळ्याला एक वेगळाच रंग देणार आहे. तसेच या सोबत विद्युत रोषणाई आणि आतिषबाजी यांचा देखील समावेश आहे.मंडळातर्फे काही स्पर्धांचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे या गणेशोत्सवा निमित्त मंडळाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी इको-फ्रेंडली गणेशमूर्ती बनवा ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, जी पर्यावरण पूरकतेचा संदेश देईल.तसेच जळगाव शहरातील महिलांसाठी रांगोळी स्पर्धा , म्युझिकल चेअर स्पर्धा , घेण्यात येणार आहेत, जेणे करून महिलांचा सहभागही उत्साहात वाढेल. तसेच आगमन सोहळ्यासाठी विशेषतः फोटोग्राफी आणि रिल मेकिंग स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली आहे आणि आकर्षक असे बक्षीस सुद्धा देण्यात येणार आहे.

मंडळाने सर्व गणेशभक्त, नागरिक व कुटुंबीयांना या आगमन सोहळ्यात सहभागी होण्याचे मन:पूर्वक आमंत्रण दिले आहे. या भव्य अशा आगमन सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे अध्यक्ष आकाश भालेराव यांनी केले आहे.

# लासलगाव येथील अहिल्यादेवी चौक ग्रा पं हॉल अंगणवाडीमध्ये स्तनपान सप्ताह संपन्न

## कार्यक्रमास भाजपा जिल्हा महामंत्री महिला मोर्चा अध्यक्षा सौ स्मिता कुलकर्णी यांची उपस्थिती व मार्गदर्शन

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

लासलगाव ग्रामपंचायत हॉल किल्ल्यामागे अंगणवाडी कार्यकर्ता लताताई जगताप यांच्या अंगणवाडीत स्तनपान सप्ताह कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे भाजपा जिल्हा महामंत्री महिला मोर्चा स्मिता ताई कुलकर्णी उपस्थित होत्या. दिनांक १ ते ७ ऑगस्टला स्तनपान सप्ताह राबवला जातो बाळाचे व मातेचे आरोग्य महत्त्वाचे आहे मातेने परिपूर्ण आहार घेतल्याने बाळाचे पोट व्यवस्थित भरते संतुलित आहार सुदृढ बालक शासनाच्या अंगणवाडी संबंधित योजना व लाभार्थी यावर स्मिता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले यावेळी सर्व मुख्यमंत्री लाडकी बहीण



लाभार्थी महिलांनी आपल्या राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेबांना राखी पाठवण्याचे मनोगत व्यक्त केले. अंगणवाडी कार्यकर्ता लता जगताप यांनी स्तनपान सप्ताह माहिती बाळाला स्तनपान कशा पद्धतीने करावे व स्तनपान केल्याचे फायदे यावर भाष्य केले सहा महिन्याच्या बालकांना अन्न प्राशन कार्यक्रम घेण्यात आला शासनाच्या गरोदर माता स्तनदा माता व लहान बालक यांच्या साठी असणाऱ्या योजनांची माहिती यावेळेस लताताई यांनी दिली. अतिशय सुंदर व सुबक पद्धतीने बालक व मातांचे स्वागतासह परिपूर्ण आहार याची सजावट अंगणवाडी सेविका प्रमिला अहिरे, आशा वर्कर अनिता भागवत, अर्चना सोनवणे यांनी केले. आशा वर्कर अर्चना सोनवणे, अनिता भागवत यांनी बालक व मातांचे आरोग्य व लसीकरण याची माहिती दिली यावेळी मैत्री ग्रुपच्या अक्षदा जोशी, शैला सोनवणे ,सोनाली कर्डिले, मनीषा जाधव, मुक्ता शिरसाठ, वत्सला खैरे, नलिनी सोनवणे, रोहिणी जाधव, स्वामिनी जगताप, कांचन शिंदे ,विमल शिंदे, कविता कर्डीले व परिसरातील माता भगिनी उपस्थित होत्या.



# खुलताबादमध्ये राष्ट्रवादीच्या नव्या नेतृत्वाचा जल्लोषात सत्कार

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै.महाभारत)

छत्रपती संभाजीनगर जिल्हाचे जिल्हाध्यक्ष आ. सतीश चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नवे तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष, शहराध्यक्ष आणि शहर कार्याध्यक्षपदे सोमवारी जाहीर करण्यात आले असून पक्षासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.खुलताबाद तालुक्यातून सुरेश जाधव यांची तालुकाध्यक्षपदी, इद्रीस पटेल यांची तालुका कार्याध्यक्षपदी, गजानन फुलारे यांची शहराध्यक्षपदी तर तौसिफ शेख यांची शहर कार्याध्यक्षपदी निवड झाली आहे.या पार्श्वभूमीवर खुलताबाद येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्क कार्यालयात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी पक्षाचे अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नवीन नेतृत्वाचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष असून ग्रामीण व शहरी भागांशी नाळ जोडणारा असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली तालुका व शहर संघटन अधिक प्रभावी आणि मजबूत करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# डॉ. साबू यांनी रोटरी प्रांताला नव्या उंचीवर पोहोचविले-मोहन पलेशा उत्कृष्ट कार्य करणारे प्रांतातील रोटरीचे पदाधिकारी, क्लबवर पुरस्कारांचा वर्षाव

जालना/ लक्ष्मण बिलोरे
( दै.महाभारत)

रोटरीच्या इतिहासात जालन्याला प्रथमच डॉ. सुरेश साबू यांच्या रूपाने प्रांतपाल पदाची संधी मिळाली आणि त्यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबरोबरच सदस्यवृद्धी, ग्लोबल ग्रँट, पब्लिक इमेज याकडे विशेष लक्ष देऊन प्रांताला नव्या उंचीवर पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे त्यांचा कार्यकाळ कायमस्वरूपी सर्वांच्या स्मरणात राहील, असे गौरवोउद्गार पुणे येथील प्रख्यात वक्ते तथा माझी प्रांतपाल मोहन पलेशा यांनी येथे बोलताना काढले.

रोटरी प्रांत ३१३२ चे मावळते प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्यावतीने रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी मंठा रोडवरील हर्षवर्धन पॅलेसमध्ये आयोजित विजयोत्सव पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे ते बोलत होते. व्यासपीठावर नूतन प्रांतपाल सुधीर लातूरे, संगीता लातूरे, डॉ. सुरेश साबू, निर्मलादेवी साबू, नियोजित प्रांतपाल क्षितिज झावरे, मधुरा झावरे, जयेशभाई पटेल, पारुल पटेल आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. सुरेश साबू म्हणाले की, ६५ वर्षात झाल्याला प्रथमच प्रांतपाल पद मिळाल्याने या पदाला न्याय देण्यासाठी मोठी जबाबदारी होती. जालना रोटरी परिवारासह प्रांतातील सर्वच उपलब्ध उत्कृष्ट कामगिरी केली. सेवा प्रकल्प, दहा नवीन क्लबची स्थापना, ग्लोबल ग्रँट, १३९ इंटरॅक्ट क्लब, रोटरी फाउंडेशनला मिळवून दिलेली भरभरून देणगी या सर्व बाबींमुळे उत्कृष्ट काम झाल्याचे समाधान आहे. मात्र यासाठी सर्वच उपलब्ध केलेल्या उल्लेखनीय कामांकरिता त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी प्रथमच जालन्यात विजयोत्सव आयोजित करण्यात आला. सर्वच क्लबचे कार्य उत्कृष्ट असल्याने पुरस्कारासाठी त्यांच्या कार्याचे परीक्षण करताना तीन आठवडे मोठी कसरत लागली. कारण प्रचंड स्पर्धा होती. सर्वांच्या सहकार्याने कार्यकाळात चांगले काम करता आल्याचे आत्मिक समाधान आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी ज्येष्ठ रोटरीयन अरुण अग्रवाल यांना रोटरीचा सर्वोच्च सर्विस अबाउ सेल्फ तर उद्योजक सुनील गोयल यांना मानव सेवातील उत्कृष्ट कार्याचा जागतिक स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच रोटरीचे




प्रमुख देणगीदार घनश्याम गोयल, समीर अग्रवाल व सौ वर्षा अग्रवाल, राजेंद्र भारुका व दिनेश भारुका, यश अनिल गोयल व गोविंद गोयल, संजय अग्रवाल यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पार पडलेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रमात प्रांतातील विविध क्लबवर पुरस्कारांचा वर्षाव झाला. उत्कृष्ट प्रांत सचिव म्हणून डॉ. सुमित्रा गादिया, उत्कृष्ट डिस्ट्रिक्ट ऑफिसर म्हणून डॉ. राजेश सेठीया, प्रांतातील उत्कृष्ट क्लब म्हणून अंबाजोगाई क्लब, उत्कृष्ट क्लब अध्यक्ष म्हणून सोलापूर क्लबचे सुनील माहेश्वरी, उत्कृष्ट क्लब सचिव म्हणून रोटरी क्लब जालना रेनबोचे सचिव गौरव करवा यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला रोटरीचे संस्थापक सदस्य श्रीनिवास भक्कड, रामकिशन मुंदडा, फुलचंद भक्कड, प्रांतातील अनेक माजी प्रांतपाल, जालना रोटरी परिवारासह ११ जिल्ह्यातील रोटरीचे पदाधिकारी हजारोच्या संख्येने उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोनाली सोनी, डॉ. सुजाता नानावटी, डॉ. स्वप्निल बडजाते, वीरेंद्र देशपांडे, विवेक मणियार यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. नितीन खंडेलवाल यांनी मानले.

# मनू मानसी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शालेय व सामाजिक उपक्रम संपन्न

## संस्थापक अध्यक्ष सौ मेघा शिंपी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व महिलांना साडी वाटप

निफाड ।रामभाऊ आवारे (दै.महाभारत)

सामाजिक क्षेत्रात सदैव अग्रस्थानी असलेल्या व सामाजिक बांधिलकी जपत अनोखा उपक्रम राबविणा-या मनु मानसी महिला बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नाशिक. यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बजरंगवाडी विल्होळी नाशिक येथे ५६ विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप तसेच बजरंगवाडी येथील हात मजुरी करणा-या ५० महिलांना साडी वाटप करण्यात आले. मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापिका सौ मेघा राजेश शिंपी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद



प्राथमिक शाळा बजरंगवाडी विल्होळी येथे ५६ विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. नोट बुक, चित्रकला वही, दुहेरी चार रेघ वही, अंकलिपी कलर पेटी, खोड रबर, शॉपनर, पेन्सिल , पेन, पट्टी आणि चॉकलेट वाटप करण्यात आले. या मुलांपर्यंत शैक्षणिक वस्तू पोहचत नाही. मनु मानसी संस्थेला या शाळेला शालेय वस्तू पाहिजे असे समजले आणि मनु मानसी संस्थेने शालेय वस्तू दिल्या. जिथे कमी तिथे आम्ही असे मत व्यक्त करून मुलांना योग्य मार्गदर्शन संस्थापिका सौ मेघा शिंपी यांनी केले.त्याचबरोबर बजरंग वाडी येथील हातमजुरी करणाऱ्या ५० महिलांना साडी वाटप करण्यात आले. मनु मानसी संस्थेच्या माध्यमातून एक महिला एक साडी हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. मनु मानसी संस्थेने या वर्षी आत्ता पर्यंत १३५ साडीचे वाटप केले आहे. या कार्यक्रम साठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बजरंगवाडी विल्होळी येथील मुख्याधापिका आणि त्यांच्या सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.संस्थेच्या संस्थापिका सौ मेघा शिंपी, सौ मिरा ज्ञानेश्वर आवारे,कविता गायके, रुपाली कोठूळे, शीला त्रिभुवने, सुरेखा घोलप, सुनिता पाठक,लीना गिरमे,शोभा सावंत, भारती जाधव उपस्थित होत्या.

# संभाजी मुंडे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर

## रविवारी होणार नाशिक येथे पुरस्कार वितरण सोहळा

परळी / विकास वाघमारे (दै.महाभारत)

न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार २०२५ चा टिव्ही ९मराठीची संभाजी मुंडे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला असून श्री मुंडे यांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार २०२५चेआयोजन रविवार दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, माजी मंत्री श्री धनंजय मुंडे साहेब , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे ,माजी आ. गोविंद केंद्रे, ह भ प डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज, श्री अनिल गर्जे,श्री .कोंडाजी मामा आव्हाड, उद्योजक बुधाची दादा



पानसरे, माजी मंत्री खा. भागवतराव कराड, श्री.मोहन दादा घुगे, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह भ प प्रकाश महाराज साठे, ह भ प सोपान महाराज शास्त्री आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

बीड जिल्ह्यातील इलेक्ट्रॉनिक मीडियातील एक नावाजलेले नाव म्हणजे संभाजी मुंडे अगदी सुरुवातीच्या काळात आपल्या ग्रामीण भागाच्या बातम्या इलेक्ट्रॉनिक मिडिया तुरळक बातम्या प्रसारित करत होता तेव्हा पासून आज तागायत इलेक्ट्रॉनिक मिडिया मध्ये सुरुवातीला कॅमेरामन म्हणून ओळख आणि आता थेट टिव्ही ९मराठी या माध्यमाच्या प्रतिनिधी म्हणून केले काम आपल्या पत्रकारिता क्षेत्रात संभाजी मुंडे यांनी समाजावर होणारे अत्याचारा विरुद्ध प्रसिद्ध, न्यायाच्या भावनेतून केलेली पत्रकारिता याचीच दखल न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेने घेऊन त्यांना यंदाचा वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला असून या योग्य निवडीचे सर्व स्तरावर स्वागत करत अभिनंदनाचा श्री मुंडेवर होत आहे.

# सेलूअंबा टोलनाक्यापासून काही अंतरावर ब्रिजच्या बाजूचे मोठाले खड्डे देत आहेत अपघातास निमंत्रण

अंबाजोगाई / सालेम पठाण (दै.महाभारत)

अंबासाखर ते लातूर राज्य महामार्गावर असलेल्या ब्रिजच्या बाजूस तीन-चार महिन्यापासून मोठाले खड्डे पडले असून या खड्ड्यामुळे अपघातास निमंत्रण मिळत असल्याचे दिसते मात्र संबंधित कंपनीचे अधिकारी, गुत्तेदार याच्याकडे कानाडोळा करत असल्याचे समजते. विशेष म्हणजे हे खड्डे शेलूअंबा च्या टोलनाक्यापासून अवघ्या (अंदाजे) सातशे कि.मीटर अंतरावर असून सुद्धा संबंधितांना मोठाले खड्डे का दिसत नसावे? हा मोठा प्रश्न सर्वसामान्य वाहनधारकांना पडला आहे , हा राज्य महामार्ग असल्यामुळे याच्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. तसेच या ठिकाणी इंग्लिश मिडीयम च्या स्कूल आहेत याच रस्त्यात वरून विद्यार्थ्यांचे बसेस चालतात. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून खड्डा नेमका किती खोल आहे याचा अंदाज वाहन धारकांना येत नसल्याने अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. या खड्ड्यामुळे एखादा मोठा अपघात झाला तर याचा जिम्मेदार कोण? असाही सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे. याकरिता संबंधित अधिकारी गुत्तेदार यांनी या खड्ड्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन ताबडतोब खंडे बुजूवून घ्यावेत व समस्यांचे निराकरण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद जुनेदपाशा (सायगावकर) व वाहनधारकांमधून





निफाड ।रामभाऊ आवारे (दै.महाभारत)

वनसगाव तालुका निफाड येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने त्यांचे प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य सी. डी. रोटे, पर्यवेक्षक राजेंद्र सोनवणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षक अरुण वाघ, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिपक गायकवाड, प्रमुख वक्ते इ. ८ वी ब चे वर्गशिक्षक बाळकृष्ण निकम आणि विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. उपशिक्षक श्री.सचिन ठुबे यांनी अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडे राहिली' या गीताचे गायन केले. कार्यक्रमाचे

# आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव, चनई, मोरेवाडी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीसह नागरी सुविधा कक्ष मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

अंबाजोगाई / सालेम पठाण (दै. महाभारत)

राज्यातील ग्रामीण भागातील प्रशासनाला आधुनिक आणि सुसज्ज पायाभूत सुविधा मिळाव्यात या उद्देशाने राज्य सरकारने ५०० नव्या ग्रामपंचायत इमारतींच्या बांधकामास मंजुरी दिली आहे. या यादीत केज विधानसभा मतदार संघातील आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव चनई आणि मोरेवाडी या ग्रामपंचायतींचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, या प्रस्तावासाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आता यश आले असून, शासनाच्या या निर्णयामुळे या भागातील ग्रामपंचायतींना सुसज्ज व आधुनिक पायाभूत सुविधा मिळणार आहेत.पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामविकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ही कामे हाती घेण्यात येणार आहेत. या योजनेतून नव्या ग्रामपंचायत इमारतींसोबत नागरी सुविधा कक्षाची उभारणी केली जाणार आहे. या ठिकाणी नागरिकांना जन्म-



मृत्यू दाखले, जात प्रमाणपत्रे, पाणीबिल भरणा, निवडणूक ओळखपत्रासंदर्भातील सेवा आदी अनेक शासकीय सेवा मिळणार आहेत. त्यामुळे गावातील प्रशासन अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होणार आहे.

या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण अनुक्रमे ६० टक्के व ४० टक्के असे राहणार आहे. यातून ग्रामपंचायत इमारतीसाठी २० लाख रुपये आणि नागरी सुविधा खोलीसाठी ५ लाख रुपये असा एकूण २५ लाखांचा निधी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी मंजूर करण्यात आला आहे. सदर निर्णयामुळे या गावातील प्रशासनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार असून डिजिटल सेवांचा ग्रामीण भागात प्रसार होणार आहे. स्थानिक नागरिकांसाठी ही सुविधा मोठी दिलासादायक सुरुवात ठरणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# नाशिक जिल्हा बँकेची नवीन परतफेड, सामोपचार योजना थांबविण्याची मागणी

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना निवेदन

नाशिक ।शांतारामभाऊ दुनबळे (दै.महाभारत)

नाशिक--: नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आणलेली २०२५-२६ ची 'नवीन परतफेड योजना' आणि 'सामोपचार योजना' या नावाखाली थकीत कर्जदार शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे.या योजनेद्वारे शेतकऱ्यांना मूळ कर्जासोबतच कर्ज अनुत्पादक होण्यापूर्वीचे सर्व व्याज आणि दंडव्याज तसेच ठेवून कर्ज अनुत्पादक झाल्याच्या दिवसापासून व्याजावर सवलत देत असल्याचे दाखवून 'कर्जवसुलीच्या विळख्यात' पुन्हा एकदा अडकवले जात आहे. १५ ऑगस्टला जिल्हा बँकेच्या कर्जातून ही परतफेड योजना नसून, लबाडा घरचे आमंत्रण आहेत. बँकेच्या



सर्वसाधारण सभेत शेतकऱ्यांनी एकमुखी विरोध करूनही तीच योजना परत माथी मारली जात असल्याचे भगवान बोराडे, राज्य अध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती यांनी म्हटले आहे शेतकरी कर्जमुक्त झाल्याची घोषणा येवल्यातून करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनांनी दिला आहे. या आहेत प्रमुख मागण्या २०२५-२६ ची परतफेड आणि सामोपचार योजना तत्काळ रद्द करावी, थकीत कर्जदार शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, नव्याने थकबाकीदार म्हणून कोणावरही दंडात्मक कारवाई करू नये, थकबाकीदारांच्या गहाण जमिनी मुक्त कराव्यात त्यांच्या मालकी हक्कावर टांगती तलवार ठेवू नये अशी मागणी करण्यात आली

# नागपंचमीनिमित्त मेहंदी स्पर्धेचे आयोजन

शिर्डी / संजय महाजन (दै.महाभारत)

विद्या प्रसारिणी सभेच्या व्ही.पी.एस हायस्कूल व द.पू. मेहता कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नागपंचमी निमित्त मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे नागपंचमीच्या निमित्ताने सांस्कृतिक विभागातर्फे प्रशालेतील विद्यार्थिनींसाठी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट मेंहदी काढणाऱ्या विद्यार्थ्यांनीना नंबर देण्यात आले. मेहंदी स्पर्धेचे नियोजन दोन सत्रात करण्यात आले. पहिल्या सत्रामध्ये इयत्ता पाचवी ते सातवी मधील २४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला तर दुसऱ्या सत्रामध्ये इयत्ता आठवी आणि नववी मधील १७८ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी स्वतःच्या आणि आपल्या मैत्रिणीच्या हातावर सुंदर मेहंदी काढली. स्पर्धेचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.धनंजय काळे आणि श्री.योगेश कोठावदे यांनी केले. दोन्ही सत्रांमध्ये स्पर्धेचे पर्यवेक्षण श्रीमती सुनिता बनकर आणि स्वाती व्हरांबळे यांनी केले.

स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनी आणि त्यांच्या उत्कृष्ट कलेचे कौतुक



प्राचार्य श्री.सुहास विसाळ, उपमुख्याध्यापक श्री.विजय रसाळ, पर्यवेक्षक श्री.श्रीनिवास गजेंद्रगडकर, श्री. अनिल खामकर, पर्यवेक्षिका श्रीमती अक्षता पाध्ये यांनी केले. स्पर्धा पार पाडण्यासाठी श्री.संजय पालवे, श्री.संकेत कवडे आणि श्री.श्रीकांत म्हसकर यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेदरम्यान प्रतिनिधी श्रीमती स्नेहलता कांबळे, श्रीमती अनुजा गोसावी, श्रीमती सई सर्जेराव, श्रीमती किरण मस्के, श्रीमती शिवानी बागलाने यांनी भेट दिली. सेवक श्री.मयूर पवार यांनी प्रकाश हॉलची व्यवस्था केली. मेहंदी स्पर्धेच्या उत्तम नियोजनाचे नियामक मंडळ अध्यक्षा डॉ.मृणालिनी गरवारे, कार्यवाह डॉ. सतीश गवळी, सहकार्यवाह श्री.विजयजी भुरके आणि नियामक मंडळ सदस्य तथा शाळा समिती अध्यक्ष श्री.भगवानभाऊ आंबेकर यांनी कौतुक केले.

# आई वडिल आणि संत सेवा करा - ढोले महाराज

बीड /प्रतिनिधी (दै.महाभारत)

सध्याची परिस्थिती पाहता समाजात विरोधी टोकाच्या भूमिका घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मानसन्मान कोणाचा करायचा आणि दूर कोणाला ठेवायचे याचे भान तरुण पिढीला राहिले नाही आई-वडील वृद्धाश्रमात तर गुरूंचाही सन्मान होत नाही अशा परिस्थितीत आजच्या तरुण पिढीने आई-वडील आणि संत सेवा करावी असे आव्हान ढोले महाराज यांनी केले.

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. या सप्ताह मध्ये मंगळवारी कीर्तन सेवा ह.भ.प. सचिन महाराज ढोले यांनी अभंग विवेचन करताना सांगितले आज समाज मध्ये खूप मोठी शोकांतिका आहे. तरणी पोर आई वडिलांना सांभाळत नाही वृद्धाश्रम वाढत आहे. शाळेत तुम्ही सर्व शिकला असाल एक दोन पासून अणुबाँब पर्यंत सर्व काही शिकवतात पण आई वडिलांना सांभाळा हे कोणत्याच अभ्यासक्रमात नाही आई वडिलांची सेवा करा हे फक्त नी फक्त कीर्तनात शिकवतात जगाच्या पाठीशी तुमच्या जवळ दोन देव आहेत एक आई व दुसरी



बाप या दोन देवाची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही . पुढे सांगताना ढोले महाराज म्हणतात की संत कधी सांगत नाहीत की मी संत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत शांतीब्रम्ह एकनाथ महाराज, संत किसन बाबा महाराज, आणि संत गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी कधीच सांगितल नाही की मी संत आहे. संताचा गुण आहे संत कधीच तुम्हाला सांगत नाहीत आणि जे ऊर बडवून सांगतात मी संत आहे, मला संत म्हणा म्हणणारे कधीच संत नसतात संतच आयुष्याच समाज कल्यानासाठी आहे. माणस आज पैसे सर्वस्व म्हणून जगत आहे . जीवन जगण्यासाठी पैसे आवश्यक आहे पण पैसाच सर्वस्व म्हणून जगणाऱ्या माणसाला पैसे सुख देऊ शकत नाही. आज करोड रुपये संपत्ती असणारे माणस आहेत त्यांना शांत झोप सुधा लागत नाही केवळ पैसा सुख देऊ शकत नाही म्हणून ढोले महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेत विवेचन करताना सांगितले की आई वडील व संताची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही. मंगळवारी कीर्तन सेवा समर्पित करताना ढोले महाराज यांना मृदुगसाथ अरुण महाराज कदम व प्रमोद महाराज पदमुले यांनी दिली आज मंगळवारी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संत ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन सेवा जानकीराम महाराज घुमरे यांनी केले केली .प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरिजागर करण्यात आला.

# रोटरी क्लब सेंट्रलचा पथदर्शी प्रकल्प 'हरित माजलगाव' उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वी

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

माजलगाव पत्रकार संघाच्या संकल्पनेतून व रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'हरित माजलगाव' या पथदर्शी प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या दोन किलोमीटरच्या पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून शहर हिरवेगार करण्याचा संकल्प या उपक्रमातून केला आहे.

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे सन २०२४/२५ चे अध्यक्ष रो.पांडुरंग चांडक, सेक्रेटरी रो. प्रभाकर शेटे, प्रोजेक्ट चेअरमन अंकुश राठोड आणि नारायण गंडे यांच्यासह नूतन अध्यक्ष रो.विनोद जाधव व सचिव रो. कैलास येलशेटे यांनी हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. लावण्यात आलेल्या झाडांना संरक्षण देण्यासाठी लोखंडी जाळ्यांचे ट्री-गार्ड बसवण्यात आले असून, पाण्याची योग्य व्यवस्थापण यामुळे ही सर्व झाडे वाचली असून चांगली वाढ झाल्याने लक्ष वेधून घेत आहेत.या उपक्रमाला मिळालेला लोकांचा सक्रिय सहभाग हेच त्याचे मुख्य यश आहे. माजी नगरसेवक शरद यादव यांनी उन्हाळ्याच्या दिवसांत टँकरने पाणी पुरवण्याचे महत्त्वाचे काम केले, ज्यामुळे लावलेली झाडे जगू शकली.याशिवाय, माजी नगराध्यक्ष शेख मंजूर, ड. भानुदास डक, डॉ. शिनगारे, व्यापारी मित्र मंडळ, बसवेश्वर जयंती समिती, वीरशैव युवक संघ आणि ज्येष्ठ नागरिक संघ यांसारख्या विविध सामाजिक संस्था व व्यक्तींनीही या प्रकल्पासाठी मोलाचे सहकार्य केले.



लोकसहभागामुळेच सार्वजनिक कामे सोपी होतात, हे या प्रकल्पाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.रोटरी क्लब सेंट्रल स्थापनेपासूनच मागील आठ वर्षे शहर परिसर व तालुक्यात रोटरीच्या माध्यमातून वृक्षारोपण मोहीम राबवत आहे आणि लावलेली सर्व झाडे वाचवत आहे.मागील वर्षांपासून हरित माजलगाव ही संकल्पना घेऊन शहरात मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येत आहे त्यातील मुख्य रस्त्यावरील दोन किमी चा पहिला टप्पा पूर्ण झाला असून या वर्षीच्या पुढील टप्प्यात डॉ. आंबेडकर चौक ते मौ. आझाद चौक तसेच बायपास रोड व केसापुरी कॅम्प पर्यंत वृक्षारोपण करण्यात येणार असून यात पर्यावरणप्रेमी सर्व नागरिकांनी उस्फुर्त सहभागी व्हावे.

-प्रभाकर शेटे
रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल

# संघर्षनायक दिपक भाई केदार यांच्या वाढदीवसा निमित्त उपळी येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न

## एकावन्न रक्तदात्यांनी केले रक्तदान !

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

ऑल इंडिया पँथर सेना राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक दलित आणि इतर मागासलेल्या लोकांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली होती.ऑल इंडिया पँथर सेना जातीय भेदभावाविरोधात लढा दिला आणि दलितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष केला.

जिथे तिथे अन्याय अत्याचार होतो तिथे दिपक भाई जातात पिढीतांन न्याय मिळवुन देण्याचे काम ते करतात निस्वर्थीपणे न कुठल्या हि प्रकराचा संकोच न बाळगता मग ते कुठल्याही जातीचे असो किंवा धर्माचे त्यांचे समाजकार्य चालुच आहे. संघर्ष नायक



ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक (भाई) केदार यांच्या वाढदिवसा निमित्त उपळी येथे सकाळी १०:०० ते ५:००पर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या मध्ये या वेळी एकून ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे आयोजन जिल्हा महासचिव वसीम भाई शेख यांनी केले होते प्रसंगी

उपस्थिथ सोनाजी घडसे, हमीद भाई शेख तालुका प्रमुख सुनील कांबळे, राष्ट्रपाल साळवे,सुनील जाधव, धम्मपाल लोखंडे ,आकाश सौंदरमल ,दिनेश मोरे यांच्या सह मतदार संघातील ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## स्वर्गीय दत्तात्रय पाटील फाउंडेशन कडून वृक्षारोपण व शालेय साहित्याचे वितरण

कुडूत्री / प्रतिनिधी (दै.महाभारत)

स्वर्गीय दत्तात्रय जी पाटील सोशल अँड मल्टीपर्पज फाउंडेशनच्या वतीने केंद्रशाळा कुमार आणि कन्या विद्यामंदिर तुरंबे येथील प्रांगणात वृक्षारोपण तसेच गरजू मुलांसाठी शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.वृक्षारोपणामुळे लिंबू, तमालपत्र, कढीपत्ता, शेवगा, पाम, आदी विविध झाडे परिसरात लावण्यात आली.कार्यक्रमामध्ये अरविंद मानकर यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व व फायदे स्पष्ट केलेत.

कार्यक्रमास फाउंडेशनचे प्रमुख डॉ.एस. डी. पाटील, नारायण सुतार, युवराज पाटील, शाळेचे मुख्याध्यापक धनाजी पाटील मुख्याध्यापक बाळू पोवार, संजय जीतकर, नाथा डवरी, पी. टी. पाटील, दीपक जरग, सागर तेली, सौ संगीता पाटील, सौ गीतांजली पाटील, अशोक कांबळे, सुरवसे, शिक्षक वृंद,

# संविधान प्रचारक, लेखक नूरखाँ पठाण यांचे बौद्धधम्म वर्षावास प्रवचन

बोरघर / माणगांव (दै.महाभारत)

गोरेगाव येथील ऐतिहासिक संबोधी विहारामध्ये सुरू असलेल्या वर्षावास प्रवचन मालिकेत संविधान प्रचारक, विश्लेषक, लेखक नूरखाँ पठाण यांनी प्रवचन मालिकेचे चौथे पुष्प गुंफले. सदर कार्यक्रम बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष चंद्रमणी साळवी होते. कार्यक्रमाचे नियोजन संदीप साळवी सर यांनी केले. महिला संघाचे नेतृत्व पंचशील महिला अध्यक्षा सौ. सुप्रिया साळवी, बौद्ध महासभेच्या रायगड जिल्हा अध्यक्षा प्रबोधनकार सौ. अस्मिता अनिल जाधव सचिव सौ. संघमित्रा गायकवाड यांनी केले. वक्ते नूरखाँ पठाण यांनी संविधान एक जीवन प्रणाली या पुस्तकाचे लेखन व प्रकाशन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या चळवळीने प्रेरित झालेल्या या लेखकाने बौद्ध धम्माचा चांगला अभ्यास केला आहे. संविधान पद्धती तथागतच्या काळापासून आहे. डॉ. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हा खरा बौद्ध धम्म आहे. या देशातील प्रत्येकाने या ग्रंथाचे आचरण केले तर सर्व जीवन सुखकर होईल असे सांगताना तथागतांच्या धम्म कार्यावर उद्बोधक असे मार्गदर्शन केले. पंचशील बौद्धजन सेवा संघाचे अध्यक्ष विकासदादा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धम्मसेवेत गोरेगाव येथे वर्षावास निमित्त मोठ्या प्रमाणात धम्मप्रचार होत आहे. यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक.सहभागी होत असतात. इतर धर्मीय लोक सहभाग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला बौद्ध आणि त्याचा धम्म इतर धम्माचे व्याख्याते सांगतात त्यावेळी एक वेगळा अनुभव व आनंद मिळतो.

वक्ते नूरखाँ पठाण म्हणतात संविदा पद्धती तथागतच्या काळापासून सुरू आहे. डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने बौद्धधम्म संस्कार पद्धतीवर संविधानाची निर्मिती केली आणि ह्या देशात सुख आणि शांती निर्माण केली आहे. बौद्ध धम्म संस्कार चे मार्गदर्शन महिलाना खुप आवडले. सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाला विभागातील ज्येष्ठ समाजसेवक रामदास जाधव, बळीराम हाटे, तुकाराम लोखंडे, हिरामण महाडिक, आयु. येवले बौद्धि उपासक, अनंत लोखंडे, विजय जाधव, नीलेश महाडिक, शरद मोरे, आयु. कदम बाबा, उपस्थित होते. महिला संघाच्या संघटक सौ रेश्मा संदीप साळवी, विजया गायकवाड, रेश्मा साळवी, भारती खांबे, रेश्मा साळवी, सुनंदा मोरे, सुवर्णा हाटे जयश्री सोनवणे, प्रणाली भूषण जाधव, सौ. विशाखा साळवी, सुवर्ण अहिरे, देवळी, भारती साळवी, राजश्री साळवी, सुचिता महाडिक, सुचिता हाटे, मांगरुल येथील विद्या लोखंडे, अपर्णा लोखंड

# द्वारका सर्कल वर बेशिस्त 'काळी-पिवळी'चा इतर वाहन चालक ना त्रास





## शिस्त लावण्याची मागणी

नाशिक ।शांतारामभाऊ दुनबळे (दै.महाभारत)

नाशिक-: द्वारका चौक सर्कल परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्नआता हळूहळू मार्गी लागत असताना बेशिस्तपणे रस्त्यावर लावल्या जाणाऱ्या काळ्या-पिवळ्या व्हॅन, रिक्षा आणि खासगी वाहनांमुळे त्रास वाढत आहे. यावर प्रशासनाने कारवाई करण्याची मागणीवाहन चालक यांच्या कडून होत आहे.

द्वारकापासून पुढे जाण्यासाठी उड्डाणपुलावर चढण्याच्या ठिकाणीच कोपऱ्यावर या वाहनांची अनधिकृत पार्किंग नेहमीच असते. रस्त्याच्या कडेला लावलेल्या या वाहनांमुळे पुलावरून खाली उतरणारी वाहने थेट रस्त्यात येऊन थांबतात. परिणामी वाहतूककोंडीचा मोठा गोंधळ निर्माण होतो. सकाळी आणि सायंकाळी शाळा-कॉलेजची वेळ तसेच कार्यालयीन गर्दीच्या तासात या ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.

अनेकदा रुग्णवाहिका आणि आपत्कालीन सेवांच्या गाड्यांनाही या बेशिस्त वाहनांमुळे अडकावे लागले आहे. प्रशासनाने यापूर्वी काही वेळा वाहने हटवण्याची कारवाई केली असली तरी ती तात्पुरतीच ठरली. वाहतूक पोलिसांच्या अनुपस्थितीत पुन्हा रस्त्यावर रिक्षा उभ्या केल्या जातात.त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. स्थानिक व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. या वाहनचालकांवर ठोस कारवाई करावी, अशी मागणी वाढत आहे.द्वारका चौक परिसरातील वाहतुकीची वाढती समस्या लक्षात घेता, बेशिस्त वाहनचालकांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवावे आणि वाहने जप्त करावीत अशी मागणी केली जाते आहे

# वंचित तर्फे तहसीलदार तहसील कार्यालय व गटविकास अधिकारी यांना निवेदन

फुलंब्री / सुधाकर जेठे (दै.महाभारत)

वंचित बहुजन आघाडीचे खुलताबाद तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले असून खुलताबाद तालुक्यातील विविध गावातील गायरान धारक लाभार्थी यांच्या नावे शेतजमीन सातबारावर लावण्यात यावे. तसेच कसत असलेल्या गायरान जमिनीमध्ये शासनाच्या सौर पॅनल अंतर्गत योजना वापरण्यात येऊ नये. तसेच मावसाळा येथील गायरान गट क्रमांक १५१,१५२,१५३ गटातील गायरान शेत जमीन मध्ये १९८० पासून आज पर्यंत तेथे विविध शासकीय इंदिरा गांधी आवास योजना घरकुल, रस्ते, गट्टू, ड्रेनेस लाईन, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, बौद्ध विहार, तसेच स्मशानभूमी अशा प्रकारच्या योजना राबवलेल्या आहे तरी ग्रामपंचायत ने दिनांक २६/ ११ व ४ /१० /२०२४ रोजीचा ठराव, पंचनामा दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी मंडळ अधिकारी तहसील कार्यालय व गट विकास अधिकारी पंचायत समिती येथे



पंचनामा ग्रामपंचायत मावसाळा यांनी दिलेला असून अद्यापही त्याच्यावर कोणतीही शासनाने कारवाई केलेली नाही असे निदर्शनात दिसून येते म्हणून वंचित बहुजन आघाडी या विषयावर गंभीरतेने विचार करून मावसाळा गावातील कोणतेही लाभार्थी वंचित राहता कामा नये म्हणून आज तहसील कार्यालय व पंचायत समिती खुलताबाद येथे निवेदन देण्यात आले त्या निवेदनात सर्व गोष्टी नमूद केले असून जर शासनाने २० ऑगस्ट २०२५ रोजी पर्यंत कुठलीही कारवाई न केल्यास वंचित बहुजन आघाडी तर्फे तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय खुलताबाद समोर धरणे आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे तरी वंचित बहुजन आघाडी तर्फे खुलताबाद तालुक्यातील सर्व गायनधारकांना व अतिक्रमधारकांना आवाहन करण्यात येते की २० ऑगस्ट२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता वार बुधवार तहसील कार्यालय समोर मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही विनंती यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मुक्तार भाई सय्यद, (तालुकाध्यक्ष)राजाराम घुसाळे, अण्णा बनकर, (तालुका महासचिव) योगेश घाटे, अमोल घाटे, विशाल घाटे, राजू नलावडे, ज्ञानेश्वर घाटे, देविदास चव्हाण, हिरालाल, रमेश उत्तम चव्हाण व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# संत नरहरी सोनार महाराज जयंती निमित्त अन्नदान

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

चरणावरी माथा नरहरी ठेविला ! हृदयी बिंबला पांडुरंग हा अभंग असलेले संत नरहरी सोनार महाराज यांच्या जयंती निमित्त माजलगाव सराफ असोसिएशनच्या वतीने मुक-बधिर निवासी विद्यालयात अन्नदान करण्यात आले.दि. ०४/०८/२०२५ रोजी संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज यांच्या जयंती निमित्त माजलगाव सराफ असोसिएशन यांच्या तर्फे मुक-बधिर निवासी विद्यालय माजलगाव येथे अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान मुक-बधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थींना मिळालेल्या भोजनामुळे त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले होते.

## महसूल सप्ताह कार्यक्रम अंतर्गत शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे

# अतिक्रमणमुक्त तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार कार्यक्रम राबविण्यात आले

ब्रह्मपुरी/ प्रतिनिधी (दै.महाभारत)

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाचे शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१६२/आस्था-०१ (ई-१) दिनांक २९ जुलै २०२५ च्या अनुषंगाने ब्रम्हपुरी तालुक्यात दिनांक १ ऑगष्ट २०२५ ते ७ ऑगष्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजि करण्याबाबत नियोजन करण्यात आले असून आज दिनांक ६ ऑगष्ट २०२५ रोजी ब्रम्हपुरी तालुक्यात महाराष्ट्र महसूल जमीन अधिनियम १९६६ चे कलम ५० व कलम ५३ नुसार प्राप्त अधिकारांनुसार तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०६.१२.२०२५ च्या निर्णयानुसार तालुक्यातील एकूण १४३९.५८ हे. आर. गायरान क्षेत्रापैकी ९२.०० हे. आर. जागेवर एकूण ३६८ अतिक्रमण धारकांना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

कूळ कायदा कलम ४३, ५०-ब आणि ५७ अनुषंगाने झालेल्या सुधारणेच्या अनुषंगाने कुळाने जमीन खरेदी करुन १० वर्षे पूर्ण झालेल्या शेतक-यांची यादी तयार करण्यात आली असून अशा शेतक-यांकडून जमीन महसूल आकारणीच्या ४० पट रक्कम तलाठी यांनी भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात आली.तालुक्यात भोगवटादार वर्ग- २ आणि भाडेपट्टयाने धारण



केलेल्या जमिनींची यादी अद्ययावत करण्यात आली असून दिनांक४ मार्च, २०२५ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झालेले नियम संबंधित जमीनधारकांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पूर्वी भरावयाच्या अधिमूल्य रकमेबाबत/सवलतीबाबत माहिती देण्यात आली. इनाम/ वतन जमिनीसंदर्भात खालसा / नष्ट झालेल्या विविध इनामांखालील अदयापही मूळ वतनदारास पुनर्दानित/रिग्रॅट न झालेल्या जमिनींची यादी गावपातळीवर तयार करण्याबाबत संवं तलाठी यांना निर्देश देण्यात आले असून अशा जमिनी मूळ वतनदाराच्या किंवा ते मयत असल्यास त्याच्या कायदेशीर वारसांच्या कब्ळयात असल्याबाबत खात्री करुन या जमिनी पुनर्दानित/ रिग्रॅट करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत पर्वणी पाटील उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी तसेच सतीश मासाळ, तहसीलदार, ब्रम्हपुरी यांनी प्रसिध्दी पत्राव्दारे केली आहे.

# अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका - बाळराजे पवार

## सरसकट पि.टी.आर वाटप करू – मुख्याधिकारी विक्रम मांडुरके

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)



शहरातील अतिक्रमण धारकास पि.टी.आर वापट करताना, कुणावरही अन्याय होणार नाही. याची दक्षता घ्या आणि पीटीआर वाटपात भेदभाव करु नका, अशी अपेक्षा युवा नेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केली. दरम्यान, अन्याय होणार नाही. सरसकट पि.टी.आर वाटप करू ,असे आश्वासन मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी दिले आहे. पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी महाराष्ट्र सरकारने २०१८ ला शासननिर्णय केला होता त्या नंतर गेवराईचे माजी.आ.लक्ष्मण अण्णा पवार यांनी तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन संजयनगर साठेनगर येथील अतिक्रमण धारकास १५ ऑगस्ट २०२१ रोजी पि.टी.आर वाटप करण्यात आले होते त्यावेळेस संजयनगर येथील शासकीय जागेवरील आरक्षण असलेल्या अतिक्रमण धारकास सोडुन संजयनगर येथील २०७ अतिक्रमण धारकास तर साठेनगर येथील २२५ अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्यात आला होता. शासकीय जागेवरील आरक्षण उठवण्यासाठी त्यांनी प्रस्ताव पाठवाला होता त्या डि.पी. प्लॅनला २०२४ ला मंजुरी मिळाल्यानंतर संजयनगर येथील काही आरक्षण उठवण्यात आले होते म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी एप्रिल महिन्यात एक जाहीर प्रगटण काढुन अतिक्रमण धारकास पि.टी.आर साठी अर्ज दाखल करण्यास सांगितले होते त्या अनुषंगाने संजयनगर येथील काही अतिक्रमण धारकास पि.टी.आर.ची प्रकिया सुरु आहे त्या संदर्भात माहीती घेऊन अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका अशा सुचना बाळराजे पवार यांनी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांना केली आहे

यावेळी माहीती देतांना मुख्याधिकारी म्हणाले की शासन निर्णयानुसार २०१८ पासून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्याची प्रक्रिया सुरु असून संजयनगर मधील अतिक्रमण धारकास टप्प्या टप्प्याने आदेश होऊन शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमण धारकास सरसकट पि.टी.आर वाटप करण्यात येणार आसल्याचे मुख्यांधिकारी विक्रम मांडुरके यांनी माहीती दिली आहे आज दि.,५ रोजी बाळराजे पवारांच्या उपस्थितीत नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळेस मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, यांच्या सह सर्व मा.नगरसेवक,पदाधिकारी व अतिक्रमण धारक उपस्थित होते



# सात्रळ कन्या विद्यालयाची निवडणूक कार्यक्रम जाहीर

राहुरी / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सात्रळ कन्या विद्यालयाची निवडणूक कार्यक्रम जाहीर यावर्षी सालाबाद प्रमाणे श्रीमती कोंडाबाई नानासाहेब कडू पाटील कन्या विद्यालय मध्ये वर्ग मंत्रिमंडळ निवडणूक जाहीर झाली आहे यासाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी होऊन अंतिम उमेदवार जाहीर झाले आहेत अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री जोंधळे ए टी यांनी माहिती दिली आहे. उमेदवारांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी सौ ब्राह्मणे मॅडम यांनी निवडणूक शांततेत पार पाडावी व सर्व मतदारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजवावा व लोकशाहीचे हात बळकट करावे असे आवाहन केले आहे. निवडणूक प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी श्री शिंदे एस सी, श्री ठोसर एस एस व श्री पलघडमल एस पी, श्री पोटकुले आर डी व इतर सर्व क्षेत्रीय अधिकारी प्रयत्न क

# भाजपच्या व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष पदावर प्रदीप कोकडवार यांची निवड

जिंतूर/बळीराज भराडे
(दै. महाभारत)



भारतीय जनता पार्टी ❊व्यापारी आघाडी परभणी जिल्हाध्यक्ष पदावर जिंतूर ता व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष प्रदीप सोपानराव कोकडवार यांची निवड करण्यात आली नुकतेच परभणी जिल्हा पदाधिकारी निवड कार्यक्रमात पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या परभणी च्या पालकमंत्री जन सपर्क कार्यालयात भाजपा नेते लोकसभा प्रमुख माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले .त्यावेळी जिंतूर जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, नूतन जिल्हा सरचिटणीस डॉ पंडित दराडे जिंतूर मंडळ अध्यक्ष विलास भंडारे , वसंतराव शिंदे, अशोक बुधवंत आदी उपस्थित होते. निवड झाल्याबद्दल व्यापारी महासंघांचे अध्यक्ष रमेश दरगड यांनी अभिनंदन केले असून त्यांचे जिंतूर येथील आर्य वैश्य समाज बांधवांच्या वतीने अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या आहेत

# शनीसेवा सोशल फाउंडेशन ने सद्गुरु गंगागिरी महाराजांच्या सप्ताहात दिली सेवा

कमलेश शेवाळे / अहिल्यानगर
(दै.महाभारत)



अहिल्यानगर : योगीराज सदगुरु गंगागिरी महाराजांचा १७८ वा हरिनाम सप्ताह शनी देवगांव ता वेजापूर जि छ संभाजीनगर येथे सुरू आहे. आणि तिथे महाराष्ट्र शासन नोंदणीकृत शनीसेवा सोशल फाउंडेशन या संस्थेला एक दिवसाची सेवा करण्याची संधी प्रा. मोहन वामने सर यांनी दिली होती. शनीसेवा सोशल फाउंडेशन ने आतापर्यंत महाराष्ट्रातील कित्येक देवस्थान मधे स्वयंसेवक म्हणून उत्कृष्ट अशी कामगिरी केली आहेच परंतु अलीकडेच आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे जाण्यासाठी निघालेल्या एकुण ४८ दिंड्याना डॉ सुधाकर निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली होती. त्यातच सदगुरु योगीराज गंगागिरी महाराजांच्या सप्ताहात सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून फाऊंडेशन चे सदस्य अगदी आनंदाने सहभागी झाले होते. यामध्ये बाळासाहेब वर्मा डॉ सुधाकर निकाळजे, बंडुकाका दहातोंडे, संभाजी दहातोंडे, बाबासाहेब भालके, बाळासाहेब जावळे, चंद्रकांत जावळे, विठ्ठल दहातोंडे, सोमनाथ दहातोंडे, निरज मनोचा, लक्ष्मण दहातोंडे, सोमनाथ जावळे, निकेतन जावळे, अरुण जावळे, शुभम अभंग, पांडुरंग जावळे, भारत धुमाळ, बाबासाहेब जावळे, सुनिल अडसुरे, संजय वैरागर,अशोक दहातोंडे, बंडू अडसुरे, सतिश शिंदे, शिवाजी शेळके, शशिकांत कर्डिले,नंदकुमार दहातोंडे, भाऊसाहेब दहातोंडे, संतोष तुपे या सेवेसाठी चांदा गावातील महिलां भगिनीं प्रथमच सहभागी झाल्या होत्या त्यामध्ये चांदा ग्रामपंचायत विद्यमान उपसरपंच सौ संगीताताई दिवटे,प्राथमिक शिक्षका शांता मरकड-दहातोंडे मॅडम, मंगल येळवंडे, मनिषा पासलकर, मिराताई दहातोंडे, राणी दहातोंडे, सुजाता दहातोंडे, मनिषा बोरुडे, मनिषा थिटे आदी सदस्यांनी सहभागी घेतला होता शनीसेवा सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष कमलेश शेवाळे यांनी सांगितले की या निशुल्क सेवेतून जो आनंद मिळतो तो जगात कुठेच मिळणार नाही यासाठी सर्व सहकार्य लाभले याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहे.

# खारघर शिल्प चौकातील वाहतूक कोंडी व हरित पट्ट्याचा योग्य वापर करण्याबाबत शेकापने आयुक्तांकडे केली मागणी

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

खारघर परिसरातील शिल्प चौक हा एक अत्यंत वर्दळीचा आणि वाहतूकदृष्ट्या अडचणीचा भाग बनला आहे. याठिकाणी रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे स्थानिक रहिवासी व पादचारी प्रचंड त्रस्त झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा सहचिटणीस तेजस्वी जगदीश घरत (कदम) यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे महत्त्वपूर्ण मागण्या केल्या आहेत.

शिल्प चौकात चार दिशेने रस्ते जात असून, सेक्टर १२ कडून येणाऱ्या रस्त्यावर दोन्ही बाजूंना वाहनांची अनधिकृत पार्किंग होत असल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत आहे. परिणामी, अनेक वेळा वाहनचालकांमध्ये वाद, शिवीगाळ व धक्काबुक्कीचे प्रसंग घडत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. तेजस्वी घरत यांनी आपल्या निवेदनात पुढील सूचनांचा समावेश केला आहे:नाल्यावर क्राँक्रीटीकरण करून रस्ता विकसित करावा - शिल्प चौक ते सेक्टर १२ दरम्यान उजव्या बाजूस असलेल्या नाल्यावर क्राँक्रीटीकरण करून त्यावर २ पदरी रस्ता तयार करावा. यामुळे वाहतुकीची कोंडी कमी होईल व नागरीकांना सुटसुटीत रस्ता मिळेल.

मध्यभागी हरित पट्टा राखावा



-नाल्यावर पुर्णपणे काक्रिटीकरण करन त्यावर रस्ता तयार केल्यास येणाऱ्या जाणा-यांसाठी २ पदरी रस्ता तयार होईल व येणाऱ्या जाणाऱ्या वाहणांची रहदारी सुरळीत होईल. नव्याने तयार होणाऱ्या रस्त्याच्या मध्यभागी हरित पट्टा राखल्यास पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल आणि परिसरात प्राणवायूची (ऑक्सिजन) मात्रा वाढेल.स्थानिक भुमीपुत्र व प्रकल्पग्रस्तांसाठी गाळ्यांची सोय करावी - नाला झाकल्यानंतर तयार होणाऱ्या जागेत छोटेखानी गाळे उभारून ते स्थानिक भुमीपुत्र व प्रकल्पग्रस्तांना भाडेतत्त्वावर किंवा कायमस्वरुपी देण्यात यावेत. यामुळे त्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल व परिसरातील बेकारपणाही कमी होईल.तेजस्वी घरत यांनी प्रशासनाकडे आवाहन केले आहे की, स्थानिक नागरीकांच्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने पावले उचलावीत व या भागातील वाहतूक व पर्यावरण व्यवस्थापन सुधारावे.

# मायबाप सरकार युवा प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी हक्काची भाकरी द्या :- दत्तात्रय मुजमुले

सांगली येथील बेमुदत आमरण उपोषण म्हणजे उद्रेकाची सुरूवातच

केज / सुमित मोरे
(दै.महाभारत)



महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर सहा महिन्यांसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून योजना काढली. त्यात अनेक तरुणांना अल्प रोजगार मिळाला.मात्र सरकारने त्यापुढे फक्त पाच महिन्याचा कालावधी वाढवत सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणींचे भविष्य अंधारात ढकलले आहे. सरकारने राज्यातील अंदाजे १ लाख ३४ हजार मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना वाऱ्यावर सोडत आहेत.बेरोजगार तरुणांच्या हाताला काम नाही, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.पुढे पाच महिने वाढीव देण्यात आले असून भविष्यात मात्र कालावधी वाढवणार नसल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे. राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व त्या खात्याचे मंत्री हे युवा प्रशिक्षणार्थींच्या भावनेशी खेळत आहेत. प्रशिक्षणार्थींना हे सरकार फसवत आहेत. युवा प्रशिक्षणार्थींना हक्काची कायमस्वरूपी भाकरी मिळवून देण्यासाठी सांगली जिल्ह्यातील कृष्णामाईच्या घाटावर महाराष्ट्र राज्य युवा प्रशिक्षणार्थी कृती समितीचे तुकाराम बाबा महाराज हे पाच दिवस आमरण उपोषणाला बसले होते.ही युवा प्रशिक्षणार्थीनच्या उद्रेकाची सुरूवात आहे.

# माधुरी हत्तीसाठी राज्यसरकार रीट पिटीशन याचिका दाखल करणार

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतलेल्या नांदणी (ता. शिरोळ) येथील नांदणी मठातील महादेवी उफर् माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने रिट पिटीशन दाखल करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मुंबईतील बैठकीत केली. त्याचबरोबर या प्रकरणात पोलिसांनी ज्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत, ते सर्व गुन्हे मागे घेण्यात यावे या आमदार राहुल आवाडे यांच्या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी निश्चितपणे सर्व गुन्हे मागे घेतले जातील, अशी ग्वाहीही दिली. शासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे महादेवी हत्तीण परत नांदणी मठात येण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

मागील ३५ वर्षे नांदणी येथील मठात असणाऱ्या महादेवी हत्तीणीला पेटा या संस्थेने महादेवी हत्तीणीची देखभाल नीटपणे होत नसल्याबद्दल तयार केलेल्या अहवालाच्या माध्यमातून जामनगर (गुजरात) येथील वनतारा याठिकाणी पाठविण्यात आले आहे. या निर्णयाच्या विरोधात सर्वच स्तरातून तीव्र भावना व्यक्त होत असून महादेवी उफर् माधुरी हत्तीणला परत आणण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात वेगवेगळ्या मार्गाने आंदोलने छेडली जात आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार राहुल आवाडे यांनी घेतलेल्या पुढाकारातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बैठक आयोजित केली होती.

या बैठकीसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, वनमंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकिय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार धैर्यशील माने, आमदार सतेज उफर् बंटी पाटील, आमदार अमल महाडीक, आमदार डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर, आमदार अशोक माने, आमदार राहुल आवाडे, माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री प्रकाश आवाडे, ललित गांधी, अपर मुख्य सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव), जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता, सदाभाऊ खोत, भालचंद्र पाटील, सागर शंभुशेटे, आप्पासो भगाटे, सागर पाटील, ॲड. मनोज पाटील, राजवर्धन नाईक-निंबाळकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार राहुल आवाडे यांनी, नांदणी येथील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य मठातील माधुरी उफर् महादेवी हत्तीण ही कोल्हापूर जिल्ह्याच्या अस्मितेचे प्रतीक आहे. सर्वधर्मीयांच्या भावना तिच्याशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे शासनाने यामध्ये हस्तक्षेप करून महादेवी हत्तीणीला परत नांदणी मठाकडे सुपूर्त करावे. सर्व जातीधर्माच्या लोकांच्या लोकभावनेचा जराही विचार न करता वनतारा येथे स्थलांतरीत करण्यात आले. स्थानिक जनभावना व धार्मिक श्रद्धा लक्षात घेऊन, पुन्हा तिला परत आणण्याची शक्यता अजूनही अस्तित्वात असलेने शासनाने यामध्ये लक्ष घालावे, अशी मागणी केली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही आपल्या मनोगतात महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी राज्य शासनाने यामध्ये लक्ष घालावे, अशी मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हत्तीणीला न्यायालयाच्या निर्णयानुसार वनतारामध्ये नेण्यात आले. त्यामध्ये शासनाची भूमिका नाही. हा न्यायप्रविष्ठ विषय आहे. परंतु हत्तीणीमध्ये गुंतलेल्या जनभावनांचा लक्षात घेऊन जे काही



कायदेशीर पर्याय आहेत त्यानुसार राज्य शासन महादेवी उफर् माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी प्रयत्न करेल. नांदणी मठाने सर्वोच्च न्यायलयात याचीका दाखल करावी. तसेच सरकार म्हणून देखील आम्हीही सर्वोच्च न्यायलयात याचीका दाखल करणार आहे. महादेवी परत यावी अशी आमची भूमिका आहे. तिची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांच पथक तयार करण्यात येईल राज्य सरकार नांदणी मठासोबत पूर्ण ताकदीनिशी सोबत राहिल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.